
**UPA National Interdisciplinary Peer-Reviewed E-Journal**
**Volume-8 (2022) : Issue-2 (November)**

IMPACT FACTOR : 5.473 (SJIF)




CHIEF EDITOR
Dr. Anil Dodewar

EDITOR
Dr. R. S. Ganvir
Dr. Pravina Nagpurkar
Dr. Mangala Gore

PUBLISHED BY:
UPA GROUP PUBLICATION
In Association with
Mahila Mahavidyalaya,
Nandanvan, Nagpur-24

CORPORATE OFFICE:
38, Mitra Nagar, Manewada Cement Road, Nagpur-24.

PUBLICATION :
The UPA Interdisciplinary e-journal is published Bi-annually.

© All Rights Reserved.

The views expressed in this publication are purely personal judgments of the authors and do not reflect the views of Journal or the body under whose auspices the journal is Published.

**For downloading the Issue, Click the link given below**
http://upa.org.in/special-issue.php?id=MTY=
**Visit Us : www.upa.org.in**

**Share your valuable feedback at**
**upanagpur@gmail.com**
**upajournal@gmail.com**

# UPA NATIONAL PEER-REVIEWED INTERDISCIPLINARY E-JOURNAL

Published By
UPA Group Publication

In Association With

MAHILA MAHAVIDYALAYA
Nandanvan, Nagpur-24



# CONTENT PAGE


| Sr. No. | Name of Researcher | Class | Title of Paper |
|---|---|---|---|
| 1 | कु. अपूर्वा इंगळे | MA-I | भारतातील साहित्यिक वारसा |
| 2 | कु. वनश्री हरडे | MA-I | संत साहित्यातील विचार |
| 3 | कु. अंकिता तागडे | MA-II | जागतिक अर्थव्यवस्थेवर आभासी चलनाच्या प्रभावाचा अभ्यास |
| 4 | कु. कल्याणी पाराशर | MA-II | कोविड-१९ चा भारतीय अर्थव्यवस्था व समाजावर झालेला परिणाम |
| 5 | कु. रश्मी रेवतकर | MA-II | जागतिकीकरण, कोरोना महामारी आणि भारतीय अर्थव्यवस्था |
| 6 | कु. रोहिणी उईके | BA-III | भारतीय स्वातंत्र्य लढ्यात राणी लक्ष्मीबाईचे योगदान |
| 7 | कु. प्रियांका अडीकणे | BA-III | विदर्भातील आंबेडकरी चळवळीमध्ये दलित स्त्रियांचे योगदान |
| 8 | कु. जोत्साना बोबडे | MA-II | कोरोना-१९ चा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम |



: PUBLISHED BY :

**UPA GROUP PUBLICATION**

In Association with

**Mahila Mahavidyalaya, Nandanvan, Nagpur-24**

# भारतातील
# साहित्यिक वारसा

अपूर्वा इंगळे

**M.A. 1st Year**

**Marathi**

नुकताच भारतातील तीन स्थळांना जागतिक वारसा स्थळ म्हणून दर्जा मिळाल्याची बातमी आली त्यावर आपण अनेक लेख, कविता, सुविचार सुद्धा वाचले. आपली भारतीय संस्कृती फार प्राचीन काळा पासून हा वारसा जपत आली आहे. त्यामध्ये अनेक साहित्यिक गोष्टींचा समावेश आहे. त्यामध्ये प्राचीन काळा पासून चालत आलेली संस्कृती, रूढी, परंपरा सातत्याने होणारे बदल व त्यातून पुढे आलेली मानवी जीवन शैली इत्यादीचा समावेश होतो.

वारसा किंवा संस्कृती म्हटली की एक पिढी कडून दुसऱ्या पिढी कडे देण्यात आलेला वारसा आधी पासून चालत आलेली परंपरा, जसे माझ्या सासू ने हे दागिणे मला दिले ते मी तुला दिले व तु ते पुढच्या पिढी पर्यंत ने असे म्हणजेच आधीच्या काळा पासून वस्तु किंवा दागिणे किंवा एखादी चालत आलेली देवाची भक्ती व संस्कार याचा सुद्धा यात समावेश होतो.

भारतीय साहित्यिक वारसा हा सुद्धा परंपरे ने चालत आलेला आहे. त्यात अभंगाची संतवाणी, संतांनी दिलेली शिकवण, त्यांनी लिहिलेले ग्रंथ, ज्ञानेश्वरी, इत्यादी गोष्टी शिकूनच मानव पुढे गेला आहे व त्यातून ज्ञान प्राप्त करूनच मानवी जीवनात बदल झालेले आपल्याला दिसून येतात. संतांनी देवाची भक्ती केली त्यातून त्यांना ज्ञान प्राप्त झाले व तेच ज्ञान त्यांनी लोकांच्या मनातून वाईट विचार दूर सारण्यासाठी त्याचा उपयोग केला व समाज कल्याण केले. लोकांना त्यांनी चांगली शिकवण दिली “एकमेकां सहाय्य करू अवघे पुढे जाऊ” असा संदेश सुद्धा समाजाला त्यांनी दिला.

साहित्यिक वारसा म्हटल की त्यात बऱ्याचश्या गोष्टींचा समावेश होतो, जसे नाटक हे अभिनयाशी संबंधित असले तरीही त्याचा थेट संबंध मानवाच्या मनोरंजनाशी जोडता येतो. यात विविध प्रकारच्या कथा नाटकाद्वारे प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्यात येतात. त्यातून अनेक लोकांना त्या बद्दलची असणारी आवड दिसून येते. ते कथानक व नायक किंवा नायिका आपल्या अभिनयाच्या पैलूतून त्यातून आपल्या पर्यंत एक चांगला संदेश पोहोचवित असतात.

आपला भारत देश हा संस्कृती प्रधान देश आहे त्यात अनेक, जाती, धर्म व विविध परंपराचा समावेश त्यात होतो पिढया न पिढया चालत आलेले संस्कार, त्यात मानवाने गरजेनुसार केलेले बदल हे दिसून येतात. हा ज्ञानवारसा घेऊनच मानव पुढे जात असतो. ज्ञान आजन्म फार महत्वाचे आहे योग्य ज्ञान असेल तर आपण आयुष्यात खुप पुढे जाऊ शकतो व त्यातून नविन समाज घडवू शकतो. योग्य - अयोग्य असे ठरवू शकतो.

काही गोष्टी अश्या असतात की ज्या आपल्याला पटत नाही मानवाने मानवाच्या सोईनुसार घेतलेले निर्णयच हे त्याचे स्वतःचे असतात पण म्हणून ते सर्वानाच पटेल असे नसते व त्यात आमूलाग्र बदल आणण्यासाठी स्वतःला त्या विषयाचे ज्ञान असणे फार महत्वाचे असते. म्हणूनच संतांनी लोकांना

घडविण्यासाठी व त्यांच्यात बदल करण्यासाठी चूक - अचूकची ओळख कळून येण्यासाठी संतांनी आपल्या जिवाचे रान केले आहे. आपल्या भारतातील साहित्यिक वारसा हयाचा आपल्या जीवनात फार मोठा वाटा आहे. साहित्य म्हटले की त्यात अनेक गोष्टींचा समावेश असतो. विविध भाषा, प्राचीन व मध्ययुगीन काळापासून चालत आलेला इतिहास काही ऐतिहासिक जडणघडण इ. चा समावेश त्यात असतो. संत साहित्य हे तर मराठी भाषेच्या प्रारंभकाळातील वैशिष्ट्च पूर्ण साहित्य आहे. संत साहित्य हा आपल्याला लाभलेला एक मौल्यवान वारसाच आहे, संतसाहित्य म्हणजे मुख्यतः महाराष्ट्रातील भागवत संप्रदायाच्या संतांनी निर्माण केलेले साहित्य होय. तेराव्या शतकात ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी' किंवा 'भावार्थ दीपीका' ही गीता टीका लिहिली. तेथपासून थेट सोळाव्या शतकात रामदासांनी दासबोधादी साहित्यापर्यंत, विठ्ठलभक्तीच्या परंपरेत निर्माण झालेल्या संतांनी साहित्य निर्माण केले त्या साहित्याला संत साहित्य असे म्हटल्या जाते.

संत ज्ञानेश्वर, संत बहिणाबाई, संत तुकाराम महाराज, संत नामदेव, मुक्ताबाई, एकनाथ, रामदास, नरहरी सोनार सावता माळी, जनाबाई या संतांनी सामान्य माणसाला अर्थपूर्ण जगण्याचा सोपा, साधा पण सुखद मार्ग दाखवून दिला. आपल्या महाराष्ट्रात अनेक संत होऊन गेले त्यात स्त्री - पुरुष दोन्हींचा समावेश आहे. आणि समाज प्रबोधनात खूप मोठा हातभार लावलेला आहे. त्यात संत मुक्ताबाई यांचा विशेष वाटा आहे. संत मुक्ताबाई या महाराष्ट्रातील संत कवयित्री होत्या. संत निवृत्तिनाथ संत ज्ञानेश्वर व संत सोपानदेन हे त्यांचे थोरले भाऊ होते. संत नामदेव महाराज हे महाराष्ट्रातील वारकरी संत होते, ते मराठी भाषांमधील सर्वाधिक जुन्या काळातील कवीपैकी एक होते. संत नामदेव प्रत्यक्ष श्रीविठ्ठल निकटवर्ती असलेला सखा होता असे मानले जाते. त्यांनी एकाहून एक सरस अभंग रचले. वारकरी संप्रदायाचे थोर प्रचारक नामदेव महाराज. जनाबाई, संत नामदेवांच्या समकालीन वारकरी संत कवयित्री होत्या. आजही खेडया - पाडयातून स्त्रिया जात्यावर दळण दळताना, कांडताना त्यांच्या ओव्या गातात. जनाबाई ह्या पंढरपूरचे वारकरी 'दमा आणि भगवदभक्त स्त्री ' कंरूड' या दाम्पत्याची मुलगी होत्या. करूंड 'विठू माझा लेकरूवाळा संगे गोपाळांचा मेळा' हा प्रसिध्द अभंग जनाबाईचाच आहे. संत जनाबाईच्या नावावर असलेले एकुण सुमारे ३५० अभंग सकल संत गाथेत मुद्रीत केलेले आहेत. ह्या शिवाय कृष्णजन्म, थाळीपाक, प्रल्हादचरित्र, बालक्रीडा, हरिश्चंद्राख्यान अशा आख्यान रचना पण त्यांच्या नावावर आहेत.

संत ज्ञानेश्वरादी भावंडात तिसऱ्या क्रमांकाचे स्थान संत सोपानदेव यांचे ते यांतील सर्वात धाकटे भाऊ होते. त्यांच्या पाठीवर मुक्ताबाई ही धाकटी बहिण ही भावंडे सतत एकमेंकासोबत राहिली, वावरली त्यांचे जीवन एकमेकांपासून वेगळे करता येतच नाही. जन्मापासून ते समाधीपर्यंत ती एकमेकांना सोडून राहीलीच नाही. जसे काही ही चार मानवी शरीरे असली तरी त्यांचा आत्मा एकच असावा एवढे ते

एकात्म होते. सोपनदेवांचे चरित्र ही बाब अतिशय महत्वाची आहे. संत ज्ञानेश्वरांच्या नंतर सुमारे २५० वर्षांनी एकनाथांचा जन्म झाला. 'बये दार उघड' असे म्हणत नाथांनी अभंगरचना, भारूड, जोगवा, गवळणी, गोंधळ यांच्या साहाय्याने जनजागृती केली. एकनाथ हे संतकवी व पंतकवी होते. त्यांनी आपल्या साहित्याद्वारे जनतेचे रंजन व प्रबोधन केले. संत एकनाथ महाराज युगप्रवर्तक होते असे म्हटले जाते. त्यांनी अभंगाच्या माध्यमातून अंधश्रध्दा निर्मुलन, जातीयतेच्या विरोधात कार्य केले. केवळ उपदेश केला नाही तर आपल्या कृतीतून दाखवूनही दिले आणि डोळस आणि कृतीशील समाज निर्मिती साठी प्रयत्न केले.

एकंदरीतच सर्व संतांनी आपल्या व्यक्तीमत्वातून समाजाला चांगली शिकवण दिली आहे. जातियवाद, गरीब, श्रीमंत ही भावना त्यांनी लोकांच्या मनातून काढून टाकली. आपल्या अभंगातून त्यांनी लोकांपर्यंत अनेक संदेश पोहोचविले व त्यांना चांगल्या मार्गावर चालविणे शिकविले. अंधश्रध्दा ही लोकांच्या मनातून काढून टाकणे व त्यातूनच एक चांगल्या समाजाची निर्मिती करणे हेच त्यांचे प्रमुख धोरण होते असे म्हणायला हरकत नाही. संत नरहरी सोनार वारकरी संप्रदायातील प्रथम शैव उपासक होते. पण एकदा शिव आणि विठ्ठल एकच आहेत असा त्यांना साक्षात्कार झाला. आणि त्यांनी आपला जीवनमार्ग विठ्ठलमय करून टाकला. असेच अनेक संतांनी समाज कल्याण केले आहे. त्यात सावता माळी हे नाव सुद्धा तितकेच महत्वाचे आहे. आपल्या महाराष्ट्राची भूमी खूप पावन आहे कारण इथे एकाहून एक सरस संत जन्माला आले हे आपले भाग्यच मानावे लागेल. ज्यांनी सामान्य जनतेला परमार्थाचा मार्ग दाखविला. आपल्या प्रपंचाला सुद्धा त्यांनी विठ्ठलाचाच प्रपंच आहे असे समजून कर्म करित राहिले ते संत म्हणजेच सावता माळी ज्यांनी संसार आणि परमार्थ वेगळा न मानता प्रपंच परमार्थमय करून टाकला. संत सावता माळी हे मराठी कवी होते. ज्यांनी बागबागायती बरोबरच विठ्ठल भक्तिचाही मळा, फुलविला, देव सदा सर्वकाळ तुमच्या सानिध्यात बसतो. हे तत्व त्यांनी सामान्य जनाच्या मनावर बिंबवले. प्रत्येक संतांची शिकवण ही आपल्या प्रत्येकासाठीच एक अमूल्य ठेवा आहे. जो आपल्याला वारसा म्हणून मिळाला आहे. प्रत्येक संतांनी भक्तीतून सामान्य जनतेला परमार्थाचा मार्ग तर दाखविलाचा आणि त्यातूनच सत्याच्या मार्गावर चालण्यासाठी मार्ग सुद्धा दाखविला. त्यांच्या कार्यातून त्यांनी समाजाला संदेश दिला आहे. देवाची भक्ती करा पण त्या सोबत माणसाने माणुसकीने वागणे व त्यांच्या सोबत एक सारखा व्यवहार करणे हे तितकेच महत्वाचे आहे. त्यात वारकरी संप्रदायातील महत्वाचे नाव म्हणजेच विठ्ठलाचे भक्त संत तुकाराम महाराज. संत तुकाराम महाराज हे साक्षात्कारी व निर्भिड संत कवी होते हे गुणधर्म त्यांनी त्यांच्या अभंगवाणीतून सामान्य लोकांपर्यंत पोहोचविले. त्यांची भावकविता म्हणजेच अभंग हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे महान घातक आहेत. रसिक आजही त्यांच्या अभंगांचा अभ्यास करतात. त्यांची विठ्ठलाप्रतिची ओढ ही आपल्या सगळयांना माहिती आहेच.

सगळयांच्या लक्षात राहील असे त्यांचे अभंग आहेत. भागवत धर्माचा कळस होण्याचे महतभाग्य त्यांना लाभले आहे त्यांच्या अभंगाला परतत्वाचा स्पर्श आहे. त्यांची प्रत्यक्षानुभुती त्यांच्या भावकाव्यात आहे. त्यांच्या अभंगातील गोडवा व भाषेतील प्रेमळपणा अभंगातून आपणास अनुभवला मिळतो. देव धर्मातील अनेक गोष्टी त्यांनी अगदी सोप्या पध्द्तीने लोकांपर्यत पोहोचविल्या. त्याच प्रमाणे भोळया अविष्ट समजुती प्रयत्नपूर्वक नष्ट करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. आपल्या समाजावरील असलेला अंधश्रध्देचा पगडा दूर करून लोकांना नवा धर्म, नवी भाषा, देण्याचे काम त्यांनी केले. स्वतः अनेक हाल अपेष्टा सहन करत लोकांची बोलणे ऐकत सुध्दा त्यांनी समाजाला मदत केली आहे. संत तुकाराम महाराजांचे धर्मक्रांतीचे, समाज प्रबोधन आजही समाजाला उपकारक ठरले आहेत. संत तुकाराम महाराज आणि विठ्ठल यांचे नाते संपूर्ण महाराष्ट्राला माहिती आहेत. ते १७ व्या शतकातील महान वारकरी होते. त्यांनी संदेह वैकुठगमन केले. विठ्ठल हे त्यांचे आराध्य दैवत होय. त्यांना वैकुंठवासी असे सुद्धा म्हण्ल्या जाते. त्यांनी त्यांचा कार्यातून अनेक लोकांना मदत केली स्वतः दु:ख सोडून लोकांची दु:खे सोडविली देवाची भक्ती करा पण त्या सोबत आपल्या सभोवताल असणाऱ्या वापरणाऱ्या लोकांनी सुद्धा मदतीचा हात दया असे त्यांचे समाज कार्य होते. आपल्याला लाभलेल्या ह्या वारसा मध्ये अनेक संत व त्यांनी केलेले कार्य आपणास पहावयास मिळते. मानवी जीवनातील झालेले बदल, व विचार करण्याची पध्दती हे यातून आपल्या लक्षात येते. तसेच या प्रवाहातील आणखी मुख्य एक नाव म्हणजेच रामदास स्वामी! त्यांना समर्थ रामदास असे सुद्धा म्हणतात. हे महाराष्ट्रातील कवी व समर्थ संप्रदायाचे संस्थापक होते. राजकारण, धर्मकारणात जाणीवपूर्वक अंतर्भूत करणारे ते एकमेव महाराष्ट्रीय संत होते. त्यांनी दासबोध लिहिला. ते संत तुकारामांचे समकालीन होते. छत्रपती शिवाजी महाराज हे समर्थ रामदासाचे शिष्य होते. आपल्या स्वराज्याच्या रक्षणासाठी रामदासांनी शिवाजी महाराजांना मार्गदर्शन केले आहे. 'समर्थांची दोन जुनी चरित्रे' हे चरित्र प्रकाशित झाले आहे. केवळ ब्रम्ह हेच सत्य आहे असे त्यांचे म्हणणे आहे. एका दृष्टिने समर्थांच्या शिकवणुकीचे सार केवळ काही शब्दांत सांगता येते - कर्म उपासना, ज्ञान, विवेक, भक्ती, प्रयत्न व सावधानता यावर त्यांची भर होता. रामदास स्वामींची वाङःमय संपदा अफाट आहे. त्यांनी २०५ मनाचे श्लोक लिहिले आहेत. त्यांनी दासबोध हा रामदासांनी १७ व्या शतकात त्यांचे पट्टशिष्य आणि लेखनिक कल्याणस्वामी करवी लिहवून घेतलेला ग्रंथ आहे. त्यांच्या दासबोधात एकुण २० दशके आहेत. समर्थ रामदास यांचे पूर्ण नाव नारायण सूर्याजी डोसर असे आहे. त्यांचा जन्म जांब, सज्जनगड येथे १३ जानेवारी १६८१, साली झाला. रामाला व हनुमताला उपास्य मानणाऱ्या समर्थ रामदासांनी परमार्थ, स्वधर्मनिष्ठा, राष्ट्रप्रेम यांच्या प्रसारार्थ महाराष्ट्रात प्रबोधन व संघटन केले रामदास स्वामींनी लिहिलेला 'दासबोध' केवळ भक्तीचा नाही तर मानवी जीवनातील दैनंदिन जीवनातल्या गोष्टीबद्दल बोलणारा व्यवहार ग्रंथ आहे. असे अनेक जण मानतात. ज्या काळात दासबोध लिहिला गेला तो काळ वेगळा होता समाज वेगळा होता, त्या काळातल्या धारणा वेगळया होत्या व जीवनशैली

सुद्धा वेगळी होती.  त्या काळातील समाज अंधश्रद्धे वर जास्ती विश्वास ठेवायचा. जून्या, रूढी, परंपरा ह्या सगळया त्या काळातील महत्वाच्या गोष्टी होत्या आधीपासून जसे चालत आले, लोक सुद्धा तसेच वागायचे, मग ते चूकीचे का असेना. रामदास स्वामींच्या दासबोधामध्ये मानवी जीवनाच्या दैनंदिन जीवनशैली मधिल भरपूर प्रश्न सूटले आहेत त्यांनी लोकांना परमार्थ करून जीवन कसे जगायचे हे शिकविले आहे.  संसार सोडून परमार्थ करायला त्यांनी कधिच सांगितले नाही.  त्यांच्या त्या शिकवणी मुळे लोकांचे जीवन सुधारले. त्यांच्यात बदल झाले, जुन्या चालत आलेल्या परंपरा सोबतच नवीन बदल समाजा स्वीकारावा, अश्या अनेक संतांनी व महाराज्यांनी परिपूर्ण असलेला हा आपला भारतीय देश आहे जुन्या वाटचालीचा आधार घेत आपण पुढे चालतो आहे.  असा वैविध्यपूर्ण संत संपन्न वारसा आपल्याला लाभला आहे.  विविध परंपरांनी नटलेला व नवीन बदल स्वीकारणारा हा साहित्यिक वारसा लाभलेला भारत देश आहे.

## संदर्भ ग्रंथ


१)  नासियबाहकर ल. रा. - मराठी वाङ्‌:मयाचा इतिहास, खंड - १

२)  जोशी प्र. न. - प्राचीन मराठी वाङ्‌:मयाचा इतिहास, फडके प्रकाशन

३)  जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री : विश्वकोश

४)  सरकारी प्रत : तुकाराम गाथा

# संतसाहित्यातील विचार

कु. वनश्री हरडे

**M.A. 1st Year**

**Research paper**

## प्रस्ताविक :-

महाराष्ट्रामध्ये मध्ययुगात संत, पंत, तंत साहित्याची निर्मिती झाली. पंत साहित्य म्हणजे पंडितांचे साहित्य, पंडित हे कुणाच्या तरी पदरी पुरोहित, कारकून म्हणून काम करित होते. ते आपल्या आश्रयदात्यांच्या आज्ञेवरून वाङःमय निर्मिती करत होते. या वाङ्ःमयामध्ये कलाकुसरी, भाषेचा डौल याकडे लक्ष दिले जाई. हे साहित्य एक विशिष्ट वर्ग नजरेसमोर ठेवून लिहले गेले. सर्व समाजाच्या सामाजिक घटनांचा संदर्भ त्यात नव्हता. तंत साहित्य म्हणजे शाहिरी साहित्य! हे साहित्य सुध्दा आश्रयदात्यांच्या अधिपत्याखाली निर्माण झाले.

एकंदरीत दोन्ही प्रकारचे साहित्य (पंत, तंत) हे आश्रयदात्यांच्या कृपेमुळे निर्माण झाले. संतसाहित्य मात्र आश्रयदात्याच्या कृपेशिवाय स्वयंस्फूर्तिने निर्माण झाले. या साहित्यामध्ये समकालीन समाज, सामाजिक परिस्थिती यांचे स्वच्छ प्रतिबिंब दिसते. या साहित्यातून समाजोद्धाराची तळमळ धर्मरक्षण, धर्मसंवर्धन, समाज प्रबोधन, सामाजिक विषमता, सामाजिक समता, स्त्री-पुरुष भेदभाव, सन्मार्गाची शिकवण इ. विचाराची पेरणी झाल्याचे दिसून येते. सभोवताली दिसणाऱ्या विपरित परिस्थितीचे चित्र बदलले पाहिजे या प्रामाणिक भावनेतून संत साहित्य निर्माण झाले. संत साहित्यातील आत्मविष्कार सच्चा आहे. हा आत्मविष्कार आत्मानुभूतीतून आलेला आहे. मानवी विकासात संतविचारांचे योगदान फार मोठे आहे. सारेच संतवाङ्ःमय उद्‌बोधनाच्या उर्मीतून उत्पन्न झाले आहे.

संत कोणत्याही धर्माचे, संप्रदायाचे असले तरी त्यांच्या साधुत्वाचे स्वरूप सर्वसाधारणच असते. त्यांच्या व्यक्तिमत्वाचे प्रभाव राजकीय पुरूषाच्या व्यक्तिमत्वाप्रमाणे मर्यादित नसते. अनेक राजकीय पुरूषांचा उदय होतो आणि त्याचबरोबर त्यांच्या कर्तृत्वाचा अस्त होतो. इतिहासाला त्यांच्या कार्याचा शोध घ्यावा लागतो. परंतु संताच्या कार्याचा प्रभाव जनमानसावर पिढ्यानपिढ्या टिकून राहतो. संताची मानवतावादी दृष्टी, उदार सहिष्णुवृत्ती या गुणांमुळे ती विभूती विश्वात्मक बनते.

## उद्देश :-

१. संत संकल्पना स्पष्ट करणे.
२. संत साहित्याचे स्वरूप स्पष्ट करणे.
३. संत साहित्यातून प्रकट झालेले विचार मांडणे
४. संत साहित्याच्या विचारामुळे समाजातील परिणामांची मांडणी करणे.
५. संत साहित्याची प्रमाणिकता, सामाजिकता स्पष्ट करणे.

## विषय प्रतिपादन :-

संत साहित्यातील विचार अभ्यासण्यापूर्वी संत संकल्पना समाजावून घेऊ, वारकरी संप्रदाय हा संतांनी जोपासलेला भक्तिप्रधान धर्मसंप्रदाय आहे. संत या शब्दाच्या व्युत्पत्तितूनच त्याचा अर्थबोध होतो. संत हा शब्द मूळ संस्कृतातील सन चे बहुवचनी रूप आहे. अस (होणे) या धातुपासुन सन हे रूप तयार झालेले, होणारा किंवा असणारा असा त्याचा वाच्यार्थ आहे. म्हणूनच संत हा शब्द अस्तित्वदर्शक आहे.

मध्ययुगीन साहित्यात 'संत' या शब्दाला विवक्षित असा अर्थ प्राप्त होऊन तीच परंपरा आजपर्यंत रूढ झालेली दिसून येते. या कालखंडातील साहित्यात महात्मा साक्षात्कारी, सज्जन अशा सत्पुरूषाला 'संत' असे म्हटले गेले. ज्ञानदेव, नामदेवांच्या काळात संत नामदेवानी सर्वप्रथम भक्ताला उद्देशून 'संत' शब्दाचा वापर केलेला आहे. रामानंद, कबीर, तुलसीदास इत्यादीची वचने ध्यानात घेता मायापार करून अद्वैताची अनुभूती घेणारा, विश्वातील दुःखितांना शांती आणि समाधान प्राप्त करून देणारा, निष्काम कर्मचरण करणारा, भगवद्भक्त म्हणजेच 'संत' अशी 'संत' शब्दामागील त्यांची धारणा असल्याचे दिसून येते.

## संताच्या साहित्यातील विचार :-

जगातील सर्व धर्माच्या व संप्रदायांच्या प्रवर्तकांनी व संतांनी जीवनाविषयी मुलभूत स्वरूपाचे चिंतन केले आहे. संतांनी लोकांना केवळ आध्यात्मिकता शिकवली किंवा भक्तिचाच उपदेश केला असे नाही तर मानवाचा लौकिक, सामाजिक, नैतिक विकास करण्याकरिता आपले विचार वेळोवेळी व्यक्त केले.

### १) विश्वबंधुत्व :-

संत साहित्यातून विश्वबंधुत्वाची भावना समोर येते. ज्ञानेश्वरांचे पसायदान हेच सांगते पसायदानातील "जो जे वांढील तो ते लाहो" या ओळी विश्वकल्याणाची तळमळ प्रकट करतात. संताच्या साहित्यातून मानवतेचा विचार दिसून येतो.

तुकारामाचे "दया, क्षमा, शांती तेथे देवाची वसती" हे सुभाषित विश्वबंधुत्वाची वेगळया प्रकारे शिकवण देतांना आढळते.

### २) समता :-

समाजाला ममतेने समतेचा संदेश सांगण्याचे कार्य संतांनी केले. समाजामध्ये समता प्रस्थापित होण्यासाठी संतांनी प्रयत्न केले. संतांची समता फक्त मनुष्यप्राण्यापुरतीच मर्यादित राहत नाही, ही समता

प्राणिमात्रा पर्यंत पोहचते. नांगी मारणाचा विंचवाला नदीतून बाहेर काढू पाहणारे एकनाथ, ज्ञानी माणसाने कुणाही प्राण्याची आपल्याकडून हत्या होऊ नये म्हणून दक्षता घ्यावी असे सांगणारे ज्ञानेश्वर समतेचे तत्वज्ञान मनुष्याबरोबरच प्राण्यांचाही बाबतीत वापरताना दिसतात.

### ३) भूतदया :-

संतांनी भूतदया दाखवावी असा विचार सर्व सामान्यापर्यंत पोहचविला भूतदया ही केवळ समाजाला सांगण्यापुरती नाही. माणसाप्रमाणे प्राणीमात्रांवर ही प्रेम करा असा संदेश संतानी समाजास दिली. संत ज्ञानेश्वर तर "भूता परस्परे पडो मैत्र जीवाचे" असे म्हणतात. संतांनी भूतदया विषयक विचार समाजमनात कृतिद्वारे व साहित्यातून महाराष्ट्रातील जनतेत रूजवले संतांनी माणसांप्रमाणे प्राण्या नाही जीव असतो. त्यानाही भावभावना असतात असा विचार समाजमनात रूजविला.

### ४) मुक्ती :-

संतांचे बहुतेक तत्वज्ञान निवृत्तीपर आहे; प्रवृत्तीपर नाही. विरक्त होऊन हरिभक्त व्हा असे संत सांगतात. जीवनाचे अंतिम ध्येय जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून मुक्ती मिळविणे हे आहे. ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे. "देवाचिये द्वारी उभा क्षणभरी तेणे मुक्ती चारी साधियेल्या" नामदेव, तुकाराम, एकनाथ या संतानीही मुक्तीबाबत विचार मांडले आहेत. जीवनाचे अंतिम ध्येय मुक्ती हेच आहे असे वारकरी संप्रदायाचे मत आहे. परोपकारी व्यक्तिच जन्ममृत्युच्या फेऱ्यातून मुक्त होऊ शकतो. असे विचार संत साहित्यातून दिसून येतात.

### एकेश्वरवाद :-

या विश्वाच्या मुळाशी एकच एक परमतत्व आहे. शिर्डीचे साईबाबा हे हिंदुप्रमाणे मुस्लीमांचेही दैवत बनले आहे. 'सबका मालिक एक' असा संदेश ते देतांना दिसतात. संतांचे हे एकेश्वरवादाचे विचार समाजस्वास्थाच्या दृष्टिने अत्यंत आवश्यक आहे.

ज्ञानेश्वर अमृतानुभवामध्ये म्हणतात "टिपऱ्या दोन पण नाद एक, फुले दोन पण सुगंध एक, दिवे दोन पण प्रकाश एक, ओठ दोन पण गोष्ट एक, डोळे दोन पण दृष्टि एक तसे सृष्टिमध्ये देवी देवतांचे तत्व व्याप्त आहे." येथे ज्ञानेश्वरांची एकेश्वरवादाचा पुरस्कार केला आहे.

### प्रयत्नवाद :-

संतांनी समाजाला प्रयत्नवादी रहा असा विचार दिला. "असाध्य ते साध्य करिता सायास कारण अभ्यास तुका म्हणे" असे संत तुकाराम म्हणतात तर "केल्याने होत आहे रे आधी केलेचि पाहिजे" असे

संत रामदास सांगतात.  जीवनामध्ये प्रयत्नाने सर्व साध्य होते. प्रयत्नच जर केला नाही तर काहीही प्राप्त होणार नाही असे स्पष्ट विचार संतानी मांडले आहेत.

## मनोबलवृध्दी :-

संतांनी समाजातील व्यक्तिीची मनोबलवृध्दी होण्यासाठी प्रयत्न केले. संत तुकाराम सांगतात. “मन करा रे प्रसन्न सर्व सिध्दीचे कारण” मन प्रसन्न असल्यावर सर्व काही प्राप्त करता येते. तुकारामांनी एक प्रकारे मनोबलवृध्दीसाठी काय करायला हवे ते सुचविले आहे.  रामदासांनी दासबोधामध्ये “आधी प्रपंच करावा नेटका। मग घ्यावे परमार्थ विवेका। येथे आळस करू नका। विवेकी हो।।” या काव्यपंक्तीतून मनोबलवृध्दीचाच संदेश दिला आहे.

## जीवनपयोगी विचार :-

संतांनी माणसाला दैनंदिन जीवनामध्ये जगताना उपयोगी पडतील असे विचार पानोपानी मांडले आहेत.  हे विचार माणसांना जीवन जगताना उपयोगी ठरतात, तुकाराम महाराज धीरापोटी फळे रताळ गोमटी असल्याचे सांगतात. म्हणजेच जीवनामध्ये संयम हा किती उपयुक्त आहे. हे ते सांगतात. एकनाथांनी व रामदासांनी मर्यादित कुटुबाचे महत्व सांगितले आहे.  माणसाची परोपकारी वृत्ती असावी असे विचार संत सांगतात. संतांनी जे विचार समाजमनामध्ये रूजवले ते आजही प्रेरणादायी ठरतात. ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, रामदास, एकनाथ, गाडगेबाबा, तुकडोजी महाराज वैगरे संतांचे विचार समाज मनाची भूमि निकोप समाज घडविण्यासाठी अनुकुल ठरतात.

## निष्कर्ष :-

१) संतांनी सर्व समाजाला विश्वबंधुत्वाची शिकवण दिली. हे विश्वची माझे घर असे व्यापक विचार समाजामध्ये रूजविले.

२) भेदाभेद विसरून मानवामध्ये समता निर्माण होईल असे विचार संत साहित्यातून आढळून येतात.

३) संतांनी भूतदयेविषयी विचार आपल्या साहित्यातून मांडल्यामूळे प्राणीमात्राकडे बघण्याचा एक दृष्टिकोन निर्माण झाला.

४) ‘जन्म मृत्यूच्या फेऱ्यातून मुक्ती’ हे जीवनाचे ध्येय वारकरी संप्रदायाने मानले असल्याने मुक्ती विषयक विचार संत साहित्यात मोठ्याप्रमाणात आढळून येतात.

५) एकेश्वरवाद हा विचार मांडून शैव - वैष्णव वादावर पडदा टाकला.

६) मनोबलवृध्दिचे विचार समाजामध्ये रूजवून संतांनी समाजाला सशक्त बनविले.

७) विविध जीवनोपयोगी विचार संतांनी आपल्या साहित्यातून मांडले त्यामूळे समाज अधिकाधिक निकोप होण्यास संत साहित्याचा हातभार लागतो.

**संदर्भ :-**


| | |
|---|---|
| ज्ञानेश्वरी | - पा. ना. कुलकर्णी |
| संत नामदेव | - हेमंत विष्णू इमामदार |
| दासबोध | - समर्थ रामदास |
| तुकाराम गाथा | - सरकारी प्रत |
| विश्वकोश | - संपा. तर्क तिर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी |
| प्राचीन मराठी वाङःमयाचा | - प्र. न. जोशी |
| इतिहास फडके प्रकाशन | - |
| एकनाथांची भारूडे | - डॉ. शीला टेंबे |
| मराठी वाङःमयाचा | - ल. रा. नासिराबादकर |
| इतिहास, खंड पहिला | - |


Email :- http://ganeshsuryavanshiblogspot.com.

# जागतिक अर्थव्यवस्थेवर आभासी चलनाच्या **(Cryptocurrency)** प्रभावाचा अभ्यास

कु - अंकिता अशोक तागडे

महिला महाविदयालय, नंदनवन

**M. A. 2nd Year** अर्थशास्त्र

## प्रस्तावना

आभासी चलन जगभर वाढत आहे. काही देशांनी त्याला मान्यता दिली आहे. भारतात या चलनास परवानगी घ्यावी अथवा नाही यावर सध्या खल सुरू आहे.

अलिकडच्या काळात मोठया चर्चेत असलेल्या बिटकॉईन, लिटकॉइन्स, बाबीक्युकॉइन्स, डोजकॉईन्स रिपल, इथेरियम इत्यादी आभासी चलने म्हणजे क्रिप्टो करन्सीजमध्ये अनेक देशांमध्ये मोठी गुंतवणुक होत आहे. या करन्सीला मध्यवर्ती बॅंका आणि शासन यांनी मान्यता घ्यावी म्हणून आग्रह धरला जात आहे. तंत्रज्ञानाच्या विकासामुळे अशी करन्सीच हेच आता भविष्य असेल, असेही म्हटले जात आहे.

वस्तु विनिमयाच्या अंगभूत मर्यादामुळे मानसाने पैसा शोधला विनिमयाचे साधन हिशोबासाठी एकक, मुल्याचे मोजमाप आणि मुल्य साठवणीचे साधन या चारही बाबी साध्य करणारी कोणतीही पैसा म्हणून स्वीकारली गेली. सुरूवातीला मौल्यवान आणि दुर्मिळ वस्तु, कालांतराने अंगभूत किंमत असलेले सोने, चांदी असे धातु पैसा म्हणून वापरले गेले पुढे सोन्याच्या साठयावर आधारित प्रतिनिधीक पैसा आला. केवळ शासनाच्या आदेशाने फियाट चलन म्हणजे फियाट करन्सी आली आणि सध्या सर्वत्र तीच वापरात आहे. त्यामूळे आता तंत्रज्ञानाच्या विकासामुळे क्रिप्टो करन्सी स्वीकारली पाहिजे असा विचार प्रबळ होत आहे. तंत्रज्ञानाने विकसित झालेली व्हचुअल करन्सी वापरत यायला काही हरकत असावी, असे नाही. परंतु क्रिप्टो करन्सी स्वीकारन्याने काय होऊ शकते याचा विचार होणे गरजेचे आहे.

सध्याचा चलनाचा पब्लिक करन्सी म्हटले जाते. आणि शासनाने व मध्यवर्ती बॅंकेने न्याचे दायित्व स्विकारलेले असते. त्या उलट क्रिप्टी ही खासगी करन्सी आहे. कोणत्याही शासन ने अथवा मध्यवर्ती बॅंकेने ती प्रसुत केलेली नाही अशा चलनाला कोणत्याही नियामकाची संमती परवानगी नाही. एक दशकापेक्षा जास्त काळ उलटला तरी बिटकॉईन इ कोणी प्रसृत केले आहे. याचा तपास लागलेला नाही. या चलनाचे निर्माण त्यात विनिमय आणि ते अदा करणे याचे दायित्व कोणचेच नाही.

केवळ तंत्रज्ञानाने अशी करन्सी बाजारात येत असल्याने किती ही संख्येने अशा प्रकारची चलने बाजारात येऊ शकतात. शिवाय या चलनाच्या मात्रेवर कोणत्याही नियमकांचे नियमन नाही. अनेक खासगी चलने आणि त्यांची अनियंत्रित मात्रा यामुळे चलन बाजारात अस्थिरता येणे स्वाभाविक आहे. क्रिप्टी करन्सी ला कोणत्याही मालमत्तेचा पाठिंबा नाही कोणत्याही सक्ती, संस्था संघटनेच्या दायित्वांची जोड नाही. त्यामुळे या चलनाच्या मुल्याचा भरवसा नाही. ज्या चलनाचा कर्ता करविताचा माहित नाही, ज्याच्यावर कोणतेच मालमत्तेचा पाठिंबा नाही, ते चलन अर्थव्यवस्थेस कसे बरे पूरक ठरेल

क्रिप्टी करन्सी या गुंतवणुकीतून बाहेर पडायचे असेल आणि त्यापोटी फियाट करन्सी हवी असेल तर त्यासाठी बहुतेक एक्सचेंजेसची अत्यंत किचकट पडताळणी प्रक्रिया पूर्ण करावी लागते आणि यात काहि महिन्यांचा कालावधी जाऊ शकतो शिवाय बहुतेक एक्सचेजेस डॉलर्समध्ये पैसे देतात अन्य चलनात सहजासहजी पैसे मिळत नाहीत. गुंतवणुक मोकळी करण्यासाठीची प्रदीर्घ आणि किचकट प्रक्रिया, वेळ, खर्च आणि बदल्यात मिळणारे चलन याची मर्यादा यामुळे क्रिप्टी करन्सीमधील गुंतवणुक अडचणीची ठरू शकते.

## क्रिप्टी करन्सीची आवश्यकता

क्रिप्टो करन्सी एक डिजिटल संपत्ति आहे. ज्याला एक्सचेंज च्या माध्यमाच्या रूपात काम करण्यासाठी डिजाईन केले गेले आहे.

आभासी चलन ही संकल्पना आता जवळपास दशकभर जुनी झाली आहे. त्यामुळे आभासी चलन म्हणजे काय हे बहुतेकांना माहित असलेच पाहिजे. आभासी चलन अर्थात क्रिप्टोकरन्सी हे संगणकीय अल्गोरिदमच्या आधारे निर्माण करण्यात आलेले चलन आहे. या चलनाला भौतिक रूप नसते. मात्र, तुम्ही आर्थिक देवाणघेवाणासाठी हे वापरु शकता.

२००९ मध्ये सातोशी नाकामोती नावाच्या एका अभियंत्याने 'बिटकॉईन' ची संकल्पना जन्माला घातली.

एका संगणकीय प्रोग्राममधील गणितीय आकडेमोड करणे बिटकॉइन अस्तित्वास आले. त्यानंतर गेल्या दशकभरात शेकडो प्रकारच्या 'क्रिप्टोकरन्सी' संगणकीय जगात निर्माण झाल्या.

फेसबुकवरून खेळला जाणाऱ्या गेम्स किंवा वापरल्या जाणाऱ्या ॲपमधील खरेदीसाठी 'फेसबुक क्रेडीट' चा वापर करता येता होता. या वेळी एका डॉलरला दहा फेसबुक क्रेडिट मिळत होते. मात्र 'फेसबुक क्रेडिट' वापरकर्त्यांच्या पचनी पडले नाही. यांची दोन कारणे होती. एक म्हणजे, त्या काळी फेसबुक आजच्या इतके जगभरात रूजले नव्हते आणि दुसरे म्हणजे तो पर्यत आभासी चलन ही संकल्पना रूढ झाली नव्हती आज हे दोन्ही अडथळे दूर झाले आहेत.

जुलै २०२० मध्येही बिटकॉईन चचेत आल होत. तेव्हा बिल गेट्स, जेफ बेझोस, इलॉन मस्क यांच्यासारख्या अब्जाधीशासोबतच अमेरिकेतल्या अनेक दिग्गजांचे ट्विटर अंकाऊटस एका सायबर हल्लाद्वारे हॅक करण्यात आले होते. त्या हल्लाला बिटकॉईन स्कॅम म्हटल गेलं होत.

याद्वारे बराक ओबामा जो बायडन, कान्ये वेस्ट यांच्या ऑफिशिअल अकाऊंटस कडेही क्रिप्टी करन्सीमध्येही देणगी मागण्यात आली होती.

## आभासी चलन (Cryptocurrency) अर्थ

अगदी सोप्या शब्दांत-क्रिप्टो करन्सी म्हणजे आभासी चलन चलनी नोटांना पर्याय असणारी एक डिजिटल वा व्हर्च्युअल करन्सी म्हणजे हे चलन भारतीय रूपया, अमेरिकन डॉलर वा ब्रिटिश पौंडासारखा नसते.

कोणत्याही देशाचं सरकार वा बॅक हे चलन 'छापत' नाही. क्रिप्टोकरन्सी हा फक्त ऑनलाईन उपलब्ध असते.

मायानिंग द्वारे या करन्सीची निर्मिती होते आणि ब्लॉकचेनच्या मार्फत या क्रिप्टो-करन्सीचे व्यवहार होतात.

जशी जगभरात रूपया, डॉलर, युरो, पाऊंड अशी विविध चलन आहेत, तशाच जगभरात वेगवेगळया क्रिप्टोकरन्सीजही आहेत.

बिटकॉईन, लाईटकॉईन रिपल, इथेरियम आणि झेड कॅश नावाच्या काही क्रिप्टोकरन्सीज प्रसिध्द आहेत. फेसबुक ही त्यांची लिब्रा नावाची क्रिप्टोकरन्सी लॉंच करायची तयारी करतय.

यातली बिटकॉईन क्रिप्टोकरन्सी साधारण दशकभरापूर्वी लॉंच करण्यात आली होती.

## बिटकॉईनचा अर्थ

बिटकॉईन ही एक प्रकारची क्रिप्टोकरन्सी आहे. बिटकॉईन हे रूपया, डॉलर किंवा इतर कुठल्याही चलनाप्रमाणे एक चलन असत. फक्त ते ऑनलाईन असत आणि एक कॅम्प्युटर कोडद्वारे एनक्रिप्टेड म्हणजे लॉक केलेल असत.

अशा आपल्याला बॅकांमधून नोटा मिळतात तसच इथही ऑनलाईन साईट्सवर हे चलन तुम्हाला तुमच्याकडच्या पैशातून खरेदी करता येते.

ही खरेदी केल्यावर तुमच एक वॉलेट तयार होत, ज्यात ही करन्सी तुम्ही साठवू शकतात. अशी प्रत्येक खरेदी केल्यावर एक नवी ब्लॉक तयार होती आणि या प्रक्रियेला माईनिंग म्हणतात.

जितके जास्त आर्थिक व्यवहार एका ब्लॉक चेनमध्ये होतील जितके अधिक ब्लॉक बनतील आणि तितकी अधिक माईनिंग होईल.

२०१७ पर्यंत जगभरातल्या एक लाखांहुन अधिक सुपरमार्केट चेन्स आणि मोठया दुकानदारांनी बिटकॉईनमध्ये व्यवहारांना मान्यता दिली आहे.

भारतातही इन्फोसिसच्या फिनॅकल या सबसिडरी कंपनीने ब्लॉकचेनच्या माध्यमातून व्यवहारासाठी ११ बॅकासोबत प्रायोगिक तत्त्वावर करार केला आहे.

## ब्लॉकचेन चा अर्थ

ब्लॉकचेन म्हणजे सोप्या भाषेत Chain of Blocks किंवा रेकॉर्डसची लिस्ट. ज्या मध्ये विविध स्वरूपाची माहिती मोठ्या प्रमाणात रियल टाईममध्ये साठवली जाते. आणि प्रत्येक साखळीचा आपल्या आधीच्या साखळीतल्या माहितीशी संबंध असतो. ही माहिती एकदा रेकॉर्ड झाल्यानंतर बदलता येत नाही माहिती एका कुलुपबंद पेटी ठेवून अशा अनेक पेटया एकात एका ठेवण्यासारख हे असतं त्यामुळे त्यांच्यासोबत छेडछाड करता येण खूपच कठीण आहे.

परिणामी हे व्यवहार अतिशय सुरक्षित होतात आणि यंत्रणा हॅक करणं शक्य नसतं. ऑनलाईन व्यवहारासाठी ब्लॉकचेन तंत्रज्ञान सगळयात सुरक्षित मानल जात. शिवाय त्यामध्ये गुप्तता आहे. आणि व्यवहार फक्त दोन व्यक्ती किंवा संगणकदरम्यान होतो. त्यामुळे त्यावर इतर कुणाच नियंत्रण नसतं म्हणूनच ब्लॉकचेन व्यवहार डेमोक्रॅटिक किंवा मुक्त मानले जाते.

## भारतात क्रिप्टोकरन्सीला परवानगी

व्हर्च्युअल करन्सीच्या माध्यमातून क्रिप्टोकरन्सीमध्ये व्यवहार करायला सुप्रीम कोर्टाने मार्च २०२० मध्ये परवानगी दिलीय.

एप्रिल २०१८ मध्ये रिझर्व्ह बॅकेने क्रिप्टोकरन्सी ट्रेडिंगवर सरसकट बंदी घातली होती. म्हणजे बॅका किंवा कोणत्याही वित्त संस्थांना व्हच्युल करन्सी शी निगडीत कोणतीही सेवा देता येणार नव्हती.

इंटरनेट अॅड मोबाइल असोसिएशन ऑफ इंडियाने याला सुप्रीम कोर्टात आव्हान दिल होता. इतर अनेक देशांनी क्रिप्टोकरन्सीच्या ट्रेडिंगला परवानगी दिलेली आहे आणि इतकच नाही तर स्वत:ची

क्रिप्टोकरन्सीदेखील लॉंच केलेली आहे.  अस इंटरनेट ॲन्ड मोबाईल असोसिएशनच म्हणजे होते. यावर निर्णय देत सुप्रीम कोर्टाने क्रिप्टोकरन्सी मध्यल्या व्यवहारांची मार्ग खुला केला.

## क्रिप्टोकरन्सीचे (Cryptocurrency) फायदे व तोटे

**फायदे** :-

बिटकॉईनचे व्यवहार कमीत कमी वेळात आणि वर्षाचे ३६५ दिवस, २४ तास आपण करू शकतो. बॅंकाच्या सुट्या नोकरशाही यांचा परिणाम या व्यवहारांवर होत नाही.

कुठल्याही व्यवहार केवळ दोन अकांऊट दरम्यान होती यात मध्यस्थायी गरज नसते.  इतर कुठल्याही ऑनलाईन व्यवहारात ही सुलभता नाही.

पेमेंट सर्व्हिस गेटवे प्रोव्हायडर म्हणून याचा उपयोग होऊ शकतो म्हणजे ऑनलाईन पैशाची देवाणघेवाण होऊ शकते त्यासाठी सगळयात सोपा गेट वे आहे.

सध्या रशिया आणि अर्जेंटिना वगळता इतर देशामध्ये बिटकॉईन व्यवहार सुरू आहेत.

यासाठी डेबिट, क्रेडिट किंवा कुठलाही कार्ड लागत नाही.  केवळ पहिल्यांदाच वॉलेट बनवायला एक ऑनलॉईन व्यवहार करावा लागतो.

तुमची माहिती अतिशय गुप्त राखली जाते.  किंबहुना ही माहिती आणि तुमचे बित्कॉईन पैसे एन्क्रीटेड स्वरूपात अर्थात कॉम्प्युटर कोटेडे असतात ते बिटकॉईन यंत्रणा चालविण्याऱ्यानाही माहिती नसतात.

**तोटे** :-

क्रिप्टोकरन्सीचा सर्वात मोठा तोटा म्हणजे त्याचे कोणतेही भौतिक अस्तित्व नाही, कारण ते छापले जाऊ शकत नाही.  म्हणजे या चलनाच्या नोटा छापल्या जाऊ शकत नाहीत किंवा कोणतेही बॅंक खाते किंवा पासबुक जारी करता येत नाही.

त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी कोणताही देश, सरकार किंवा संस्था नाही, ज्यामुळे कधी कधी त्याच्या किंमतीत मोठी उडी होते तर कधी खूप घसरण होते, त्यामुळे क्रिप्टो करन्सीमध्ये गुंतवणुक करणे धोकादायक ठरते.

हे शस्त्रास्त्र व्यापार, अंमली पदार्थांच्या पुरवण, काळाबाजार इत्यादी चुकीच्या कारणासाठी सहजपणे वापरला जाऊ शकतो, कारण तो फक्त दोन लोकांमध्ये वापरला जाऊ शकतो. त्यामुळे ते खूप धोकादायक देखील असू शकते.

हॅक होण्याचा धोकाही असतो ही वस्तुस्थिती आहे की ब्लॉकचेन हॅक करणे तितके सोपे नाही कारण त्यात संपूर्ण सुरक्षा व्यवस्था आहे. असे असतानाही या चलनाचा कोणाही मालक नसल्याने हॅकिंगची शक्यता नाकारता येत नाही.

याचा आणखी एक तोटा म्हणजे जर तुमच्याकडून एखादा व्यवहार चुकून झाला असेल, तर तो परत घेऊ शकत नाही, त्यामुळे तुमचे नुकसान होते.

## **Cryptocurrencies मध्ये invest कसे करावे ?**

क्रिप्टोकरन्सीमध्ये गुंतवणुक करण्यासाठी, तुम्हाला योग्य व्यासपीठ निवडावे लागेल कारण जर योग्य प्लॅटफॉर्म निवडला नाही तर तुम्हाला ट्रेडिंग करताना अतिरिक्त फी भरावी लागू शकते. त्याचप्रमाणे सध्या भारतातील सर्वात लोकप्रिय क्रिप्टीकरन्सी प्लॅटफॉर्म “Wazire” आहे.

यामध्ये गुंतवणूक करणे आणि व्यापार करणे खूप सोपे आहे आणि त्याचे संस्थापक देखील भारतीय आहेत. मी त्यात गुंतवणूकही केली आहे आणि अनेक वर्षापासून केली आहे आणि अनेक वर्षापासून केली आहे. तुम्हाला हवे असल्यास तुम्ही तुमचे पैसेही त्यात गुंतवू शकता.

## सारांश :-

क्रिप्टो करन्सी आजच्या जगभरात खूप जास्त प्रमाणात व्यवहारात वापरली जाणारी चलण आहे. आभासी चलनाची जगभरात गुंतवणुक मोठ्या प्रमाणात केली जात आहे. क्रिप्टो ही खाजगी करन्सी आहे. त्यामुळे या करन्सी ला शासनाने मदत व प्रोत्साहन दिलेले नाही. तसेच क्रिप्टो करन्सी ला कोणत्याच मालमत्तेचा पाठिंबा नाही जुलै २०२० पासुन क्रिप्टो करन्सी चर्चेत आले आहे.

क्रिप्टो करंन्सी ही फक्त ऑनलाईन उपलब्ध आहे. त्यामुळे या करंन्सी चा व्यवहार हा सुध्दा ऑनलाईनच करावा लागतो किंवा स्विकारला जातो.

क्रिप्टो करंन्सी चे फायदे व तोटे दोन्ही उद्‌भवतात. क्रिप्टो करन्सी ही ऑनलाईन उपलब्ध असल्यामुळे या चलनाचा व्यवहार कधीही, कुठेही करता येतो. या व्यवहारात मध्यस्थाची गरज नसतेच व तसेच या व्यवहारात तुमची माहिती गुप्त राखली जाते.

तोटे म्हणजे ही करन्सी कोणत्याच मालकीची नसल्यामुळे कधी उडी मारली जाते तर कधी खूप घसरण होते तसेच ही करन्सी काळा बाजार अशा चुकीच्या कारणांसाठी सहजपणे वापरली जाते तसेच या व्यवहारात हॅकिंग ची शक्यता नाकारली जात नाही.

एकंदरीत शासनाची व रिझर्व्ह बँकेची मान्यता नसतांना सुध्दा क्रिप्टो करन्सी ही भारतात व जगभरात वाढत चालली आहे. व यात व्यवहार केले जात आहे. या आभासी चलनाची वाढ होईल की घट हे सांगता येणार नाही. परंतु नविन तंत्रज्ञान वापरायला काही हरकत नाही.

## संदर्भसुची :-


1) https.//maharashtratimes.com/virtual-currencies-like-bitcain-litcaims-bbqcaind-dodgecoins-ripple-etherium-etc-are-huge-investments-in-crytocurrencies-in-many-countries

2) https://www.bbc.com/marathi/india-42169562

3) नव्या जागतिक चलनाची नांदी ? हा लेख आसिफ बागवान ३१ मे २०१९

4) लोकसत्ता (बातमी पत्र)

5) https:/marathi.webdunia.com

# कोविड - १९ चा भारतीय अर्थव्यवस्था व समाजावर झालेला परिणाम

कु. कल्याणी अशोक पाराशर

महिला महाविद्यालय, नंदनवन, नागपूर

**M.A. 2nd Year** अर्थशास्त्र

## कोविड - १९ चा भारतीय अर्थव्यवस्था व समाजावर झालेला परिणाम

### प्रस्तावना :-

कोरोना नामक नव्या आजाराला कारणीभूत लागन झाल्याचे दिसून येते. या करिता प्रत्येक देश आपल्या पद्धतीने कोरोनाला हरवायचा प्रयत्न करीत आहे. या आजाराची उत्पत्ती चीनमधील वुहान या शहरातुन झाल्याचे निष्पन्न झालेले आहेत. वुहान कोरोना व्हायरस २०१९-२० मध्ये चीनच्या वुहान शहरात २०१९ च्या मध्यभागी एक नविन प्रकारचे कोरोना व्हायरस संसर्ग म्हणून प्रारंभ झाला. बऱ्याच लोकांना हे निमोनीयाचे लक्षण असावे असे वाटु लागले. त्यातुन असे दिसून आले की, मासे पिडीत बहुतेक लोक वुहान सीफुड मार्केटमध्ये मासे विकतात आणि सजीव जनावरांचा व्यापार करतात. नंतर चिनी शास्त्राज्ञाने कोरोना व्हायरस एक नविन विषाणू आहे हे ओळखले. जे लोक बाजाराशी संबंधित होते त्या बऱ्याच लोकांमध्ये या वायरसचे लक्षने दिसून आली. हा विषाणू एसएआरएस इतका गंभीर किंवा जीवघेणा आहे की नाही हे आधी स्पष्ट झालेले नव्हते. २० जानेवारी २०२० रोजी चिनी पंतप्रधान ली केकियांग यांनी त्याला कोविड रोगाचा प्रतिबंध करण्यासाठी आणि त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी निर्णायक व प्रभावी प्रयत्न करण्याचे आव्हान केले. मार्च ३१, २०२० पर्यंत जगाच्या जवळपास १८० देशांमध्ये या रोगाने धुमाकुळ घालून कित्येक लाख लोकांचे प्राण या आजाराने घेतले त्यामुळे हा आजार संपूर्ण जगासाठी आव्हान ठरलेले आहे.

प्रथम संशयीत प्रकरणे WHO कडे ३१ डिसेंबर २०१९ रोजी नोंदविण्यात आली. रोगनिदान विषयक आजाराची पहिली घटना डिसेंबर २०१९ रोजी नोंदविण्यात आली. १ जानेवारी २०२० रोजी बाजार बंद झाला. आणि कोरोना व्हायरसच्या संसर्गाची चिन्हे असलेल्यांना वेगळे केले गेले २३ जानेवारी २०२० रोजी वुहानला बाजूला ठेवण्यात आले आणि वुहानमधील व बाहेरच्या सार्वजनिक वाहतुकीला स्थगिती दिली. जानेवारी २०२० रोजी, कोरोना विषाणूचा प्रसार हा जागतिक आरोग्य आणिबानी म्हणून घोषित केले.

### संशोधनाची उद्दिष्टये :-

कोरोनामुळे अर्थव्यवस्थेवर व समाजावर झालेली परिणाम जाणुन घेणे

### कोरोना वायरसमुळे समाजावरील परिणाम :-

कोरोनाचा संसर्गजन्य विषाणु जानेवारी २०२० पासून जगाच्या वेगवेगळया देशांमध्ये पाय पसरवायला सुरूवात केलेली होती. एप्रिलच्या शेवटपर्यंत जवळपास १९३ देशात कोरोनाचा संसर्ग पसलेला होता. या विषाणूमुळे संपूर्ण जगाला आपल्या कवेत घेतलेले आहे. या विषाणूमुळे संपूर्ण देशाची अर्थव्यवस्थाच कोलमुडून गेलेली आहे, म्हणजेच या रोगाचा सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक, आरोग्य, सांस्कृतिक, पर्यटन, दळण-वळण, व ग्रामीण भागातील शेतीव्यवसायावर देखील परिणाम झालेला दिसून येत आहे.

### सामाजिक परिणाम :-

कोरोनामुळे सामाजिक परिणाम झालेला आहे. देशातील लोकांनी उन्हाळयामध्ये जे केलेले होते, त्या संपूर्ण नियोजनावर कोरोनामुळे संपूर्ण पाणी फिरलेले दिसून आलेले होते. एकमेकांशी संवाद साधने, एकत्र बसून कोणत्याही कामाचे नियोजन या कोरोनामुळे बिघडलेले आहे. लग्नसमारंभ, नातेवाइकांच्या

भेटीगाठी यासारख्या सामाजिक कार्यक्रमावर वाईट परिणाम झालेला दिसून आलेला होता. कोणी मरणपावले तरीही त्यांच्या मरणाला जाण्याची परवानगी घ्यावी लागत होती. कोरोनाच्या भितीमुळे लोकांचे सकाळचे फिरणेही बंद झालेले होते. कोरोनापूर्वी बाहेर ठिकाणी पोट भरण्यासाठी गेलेल्या मंजुराचे हाल होत होते. काही लोक आपल्या रक्ताच्या नात्यापासून दुर कुठेतरी अडकलेली होती.

## धार्मिक परिणाम :-

देशाची अर्थव्यवस्था काही प्रमाणात धार्मिक समांरभावर व धार्मिक ठिकानावर अवलंबून असते. परंतु कोरोनामुळे यादी कार्यक्रमांवर बंदी आणली गेली होती. भारतीय समाजात अनेक प्रसिद्ध धार्मिक देवालये आहेत त्याठिकाणी भाविक मोठ्या श्रद्धेने आपल्या इच्छा आकांक्षांची पुर्ती देवदर्शनातून होते त्याकरिता देशाच्या वेगवेगळ्या भागातुन देवदर्शनासाठी जातात. तर काही भाविक त्या पावन स्थळांना आपल्या इच्छेनुसार दान पण देत असतात. बाहेरून जाणाऱ्या भाविकामुळे त्या ठिकाणच्या लोकांची पोटपाण्याची व व्यवसायाची भरभराट होत असते. परंतु कोविड-१९ मुळे या व्यवसायावर परिणाम झालेला दिसून येतो. त्याबरोबरच त्या वर्षीच्या धार्मिक उत्सवावरही बंदी आणल्यामुळे धार्मिक कार्यावर परिणाम झालेला आहे.

## आर्थिक परिणाम :-

कोणत्याही देशाची प्रगती त्या देशाच्या अर्थव्यवस्थेवरून दिसून येते. देशाचा विकास किती झाला हे पाहण्यासाठी एकूणच त्या देशातील व्यक्तीच्या राहणीमानावरूनही दिसून येते. पण कोविड - १९ मुळे देशाची अर्थव्यवस्थाच थांबली आहे याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर झालेला दिसून येतो. देशातील कारखाने, छोटे उद्योग, इतर उत्पादने देणारे साधने कोविडच्या संसर्गजन्य वायरमुळे थांबले, त्याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर झाला. देशाला सर्वात मोठ्याप्रमाणात उत्पादन मिळवून देणारी रेल्वे ही थांबली हा सुद्धा देशाच्या अर्थव्यवस्थेवर परिणामच आहे. एकूनच दळणवळणाची मग ते एस. टी. महामंडळ असो की इतर खाजगी प्रवासाचे साधने असो या सर्व गोष्टींवर परिणाम झालेला आहे. त्याबरोबरच लहान मोठे उन्हाळयाच्या दिवसात व्यवसाय करणारे यांच्यावरही फार मोठा परिणाम झालेला आहे. कोरोनाचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम झाल्यामुळे सरकारने देशातील जनतेला आव्हान केले की आपण देशाच्या मदतीकरिता अर्थसाहाय करा. देशातील जनतेने सरकारची ही सुचना मान्य करून पी. एम. व. सी. एम. फंडात पैसा जमा करायला सुरूवात झाली.

## आरोग्यावर परिमाम :-

कोविड - १९ मुळे देशातील जनतेवर व त्यांच्या आरोग्यावर मोठा परिणाम झालेला दिसून येतो. या रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी डॉक्टर, नर्सेस, कंपाऊडर, वार्डबाय तंत्रज्ञ व यासारखे काही समाजसेवी संस्था दिवस रात्र काम करित आहेत. यांना मदत म्हणुन पोलीस दल हे सुद्धा देशाचे आरोग्य अबाधीत राखण्यासाठी प्रयत्न करीत आहे. एवढेच नाही तर लोकांना समजावूनही सांगत आहे की तुम्ही घराच्या बाहेर निघू नका आरोग्याची काळजी घेण्यासाठी लोकांना मार्गदर्शनही करीत आहे जे ऐकले नाही त्यांना लाठीचा प्रसादही देत आहे. जे लोक आरोग्य सेवेत काम करीत आहे अशा काही लोकांना आपले प्राणही गमवावे लागले. त्याकरीताच लोकांना घरी राहण्याचा सुरक्षित अंतर ठेवण्याचा, तोंडाला मास लावण्याचा, वारंवार हात स्वच्छ धुण्याचा सल्लाही ही वैदयकीय अधिकारी देण्याचा प्रयत्न करीत आहे. एकुणच समाजाचे आरोग्य चांगले असावे म्हणून वारंवार सुचनांचे पालन जनतेने करावे व आपल्या देशातुन कोरोनाला हाकलुन लावुया, आणि समाजाचे आरोग्य अबाधीत राखुया.

**राजकीय परिणाम** :-

कोविड - १९ चा राजकरणावरही परिणाम झालेला दिसून येतो. देशाच्या अनेक राज्यामध्ये काही ठिकाणी पोट निवडणुका होत्या तर काही ठिकाणी जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत इत्यादि निवडणुका होत्या. परंतु या सर्व राजकीय कार्यक्रमांना कोविड - १९ या साथीने या कार्यक्रमांवर पाणी फेरले हे सर्व राजकीय कार्यक्रम पुढे घेण्याचे ठरविण्यात आले. एवढेच नव्हेतर कोणत्याही नेत्याला कोविडचाच विचार करून निर्णय घ्यावा लागत आहे. देशातील इतर राजकीय कार्यक्रम सध्यातरी थांबलेच दिसून येत नाही आहे. ते हळुहळु आपल्या गतीने चालु होत आहे.

**शैक्षणिक परिणाम** :-

या विषाणूचा परिणाम देशातील शैक्षणिक संस्थावर सुद्धा झालेला आहे. ऐन परिक्षेच्या तोंडावर या विषाणुने आपले डोके वर काढले आणि देशाच्या भावी पीढीची वताहत केली. अनेक विद्यार्थी शिक्षणासाठी आईवडीलापासून दुर राहतात त्या मुलांच्या शिक्षणावर परिणाम होतो. त्यांच्या जो उत्साह होता तो या कोरोनाने हिरावून घेतलेला आहे. अजूनही परिक्षा कधी होईल हे निश्चित झालेले नाही. त्यामुळे शैक्षणिक परिणाम तेव्हा दिसून आला होता. आताही एकुनच शिक्षणासी संबंधित सर्वच गोष्टिवर परिणाम झालेला आहे हे नकारता येत नाही.

**पर्यटनावर परिणाम** :-

बाहेरच्या देशातून आपल्या देशामध्ये अनेक पर्यटक येतात. त्याचा फायदा आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेला होत असतो. तसेच त्या ठिकाणच्या व्यवसायिकांनाही होत असतो. परंतु तेव्हा कोविडने याही व्यवसायावर पाणी फेरले होते आणि देशाच्या अर्थव्यवस्थेला चटका लावून ठेवला होता.

**सारांश** :-

कोविड - १९ या संसर्ग जन्य रोगाने देशाच्या जीवनावर परिणाम केलेला आहे. माणसापासून माणसाला दुर ठेवण्याचा कार्यक्रम या कोविडने केलेला होता. दुसरे म्हणजे समाजाचा आरोग्यावरही परिणाम झालेला आहे. देशातील काही लोक शेकहॅन्ड घ्यायचे परंतु तेही या कोरोनाने हिरावून घेतले होते. एकमेकांच्या जवळ जावून बोलनेही थांबले होते. दुरूनच रामराम करून त्याला बगल देत होते. एकमेकांच्या संपर्कापासून व्यक्ती दुर गेलेला होता. कोविडचा आणखी एक परिणाम म्हणजे देशाच्या अर्थव्यवस्थेवर झालेला आहे. देशाची अर्थव्यवस्था या कोरोनामुळे डबघाइस आलेली दिसून येते. कारण देशाच्या एकुन उत्पादनावर याचा परिणाम झालेला आहे. एकुणच देशाच्या विकासामध्ये कोरोनाने अडचणी निर्माण केलेल्या आहे. शेवटचा निष्कर्ष म्हणजे असा की देशाचे जनजीवन विस्कळीत झालेले आहे. काही लोक मंजुरीसाठी बाहेरगावी गेले होते त्या लोकांना घरी येणे शक्य नसल्यामुळे मध्येच कुठेतरी थांबावे लागले. काही व्यक्ती १००० हजार चा राजकारणावरही प्रवास करून आपल्या घरी पोहचले एवढेच नव्हेतर कोरोनाने अनेक समस्याही निर्माण केलेल्या आहेत.

**संदर्भसुची** :-


१) प्रा. डॉ. पंढरी एन. वाघ. (समाजशास्त्र विभाग प्रमुख)

२) https://maharashtratimes.com

Date – 26 December 2020

# जागतिकीकरण, कोरोना महामारी
# आणि
# भारतीय अर्थव्यवस्था

कु. रश्मी संजयराव रेवतकर

महिला महाविद्यालय, नंदनवन, नागपूर

**M. A. 2nd Year**

## सारांश :-

भारताने जुलै १९९१ ला नव्या आर्थिक धोरणाचा स्विकार केला. जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण हे त्याचे तीन पैलू आहेत. जागतिकीकरणामुळे संपुर्ण जग एक अर्थव्यवस्था, एक बाजारपेठ असे समजण्यात आले. अर्थव्यवस्थेवरील बंधने काढून टाकण्यात आले. अर्थव्यवस्था मूक्त झाली. आयात निर्यातीकरीण सर्व बंधने हटविण्यात आले. व बहुराष्ट्रीय कंपन्यांचे प्रस्त वाढले. जागतिकीकरणामुळे विकसीत देशांच्या अर्थव्यवस्थाबरोबरच अविकसित व विकसनशील अर्थव्यवस्था मजबुत होतील त्यांच्या विकासाची गती वाढेल ही अपेक्षा करण्यात आली. परंतु भारतीय अर्थव्यवस्थेच्या बाबतीत कायमस्वरूपी तसे घडुन आले नाही. जागतिकीकरणाच्या सुरूवातीला अर्थव्यवस्थेच्या विकासाचा दर वाढत गेला. २००८ च्या जागतिक महामंदीची झळ सुध्दा थोपवून ठेवण्यात तत्कालीन सरकारला यश आले. या मंदीतही राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा जीडीपी दर स्थिर ठेवता आला. परंतु सरकार बदलताच जीडीपीवर अनिष्ट परिणाम घडत गेल्याचे दिसून येते. एके काळी ९ टक्क्यांपर्यंत वाढलेला जीडीपी दर कमी कमी होत गेला. निश्चलीकरणामुळे अर्थव्यवस्थेच्या विकासाचा फारच आघात झाला. २०१६ च्या काळात राष्ट्रीय उत्पन्न ९.१ टक्क्यापर्यंत वाढले होते. ते नंतरच्या काळात तग धरू शकले नाही. ९ नोव्हेंबर २०१६ च्या विर्मोद्रिकरणामुळे आणि कराच्या रचनेत बदल करून जीएसटी लागू केल्यामुळे विर्मोद्रिकरण व जीएसटी या दोघांचे अनिष्ट परिणाम अर्थव्यवस्थेवर घडून आले. कमीत कमी १४ टक्के व जास्तीत जास्त २८ टक्केपर्यंत जीएसटी दर ठेवण्यात आला. उदारीकरणामुळे भांडवलदराचे अधिक हित साध्य झालेले दिसते त्याचप्रमाणे खाजगीकरणाच्या नावाखाली निर्गुंतवणुक वाढत गेली. निर्गुंतवणूकीच्या प्रक्रियेत सार्वजनिक उद्योगाचे खाजगी उद्योगात परिवर्तन होत असल्यामुळे कोटयावधींची मालमत्ता लाखोंमध्ये विकल्या जाऊ लागली. सार्वजनिक उद्योगधंदयातील नोकरधारक बेकार होत गेलेत. अशा परिस्थित भर पडती ती कोवीड १९ च्या महामारीची आज कोवीड महामारीत भारताचा दुसरा क्रमांक लागला असून वेळोवेळी लावण्यात आलेल्या लॉकडॉऊनमुळे व्यापार, उद्दिम व रोजगार या क्षेत्रांवर फारच अनिष्ट परिणाम घडून आला. अकुशल श्रमिकांच्या बरोबर कुशल श्रमिकही बेरोजगार झालेत. परिणामतः सामान्य लोकांच्या दारिद्रियात व भुखमरीत वाढ होत गेली.

या सर्व परिस्थितीचा परिणाम जागतिकीकरणामुळे संकटात सापडलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेवर घडून येणे स्वाभाविक आहे. जागतिकीकरणात २ टक्क्यांपर्यंत असलेल्या राष्ट्रीय उत्पन्नाचा दर कोविड महामारिमुळे सध्या २३.९ टक्क्यांपर्यंत ऋणात्मक झाला. यावरून भारतीय अर्थव्यवस्थेच्या उत्थानासाठी यातून मार्ग काढण्यासाठी व आपले अति उत्पादन विकण्यासाठी पाश्चात्य विकसीत राष्ट्रे जगातील नवनवीन बाजारपेठा शोधू लागले. दुसरे महत्वाचे कारण म्हणजे भारतासारख्या विशाल लोकसंख्या असणाऱ्या देशात बाजारातील वस्तुंच्या मागणीत लवचिकता अधिक असते. ज्या बाजारपेठातून कमी किंमतीला वस्तू प्राप्त होतात ती बाजारपेठ व त्यातील वस्तू खरेदी करण्याची लोकांची प्रवृत्ती असते. त्यामुळे अशा देशात आपल्या अतिरिक्त वस्तू विकण्याची सोय करावी असे विकसीत राष्ट्रांतील लोकांना वाटणे स्वाभाविक होते. यातून राशिपातनाची प्रवृत्ती वाढणे हे स्वाभाविक झाले आहे. स्वदेशात वस्तूच्या किंमती जास्त व विदेशात किमती कमी ठेवून विदेशी बाजारपेठांवर ताबा मिळविणे शक्य आहे ह्याची जाणीव विकसीत राष्ट्रांना होती.

भारताने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मिश्र अर्थव्यवस्थेचे प्रारूप मांडले. परंतु जागतिकीकरणाचा स्विकार केल्यानंतर भारतीय अर्थव्यवस्थेचे प्रारूप भांडवलशाहीला चालना देणारे व मुक्त व्यापाराचे समर्थन करणारे ठरले. त्यामुळे भांडवलशाहीचे दोष भारतीय अर्थव्यवस्थेला सोसावे लागतील व त्यासाठी काही वेगळे

प्रयत्न करावे लागतील याकडे दुर्लक्ष करण्यात आले. त्यामुळे भांडवलशाहीचे दोष भारतीय अर्थव्यवस्थेत निर्माण होऊन आर्थिक विषमता, दारिद्रिया व बेकारीसाठी समस्यांनी आज उग्र रूप धारण केले. उदारीकरण व खाजगीकरण या धोरणामुळे खाजगी भांडवलदराचे जास्त हित साधले गेले. भारतीय समाजव्यवस्थेत पुर्वीच असलेल्या वर्ण व जाती व्यवस्थेला आणखी खतपाणी मिळाले, श्रीमंत व गरीब यातील दरी वाढत गेली. इतकेच नव्हे तर सामाजिक - आर्थिक विषमताही वाढत गेली.

## खाजगीकरण आणि भारतीय अर्थव्यवस्था :

जागतिकीकरणाच्या धोरणातील उदारिकरण व खाजगीकरण या सुत्रांमुळे अर्थव्यवस्थेच्या रचनेत आमुलाग्र बदल झाले. सार्वजनिक उद्योगधंदे आजारी असून तोटयात चालतात असे समजून त्यांची निर्गुंतवणूक करावयास सुरूवात झाली. परवाना पध्दती अतिशय सूलभ करण्यात आली. परिणामतः भारतीय बडया औद्योगिक घराण्यांकडे संपत्तीचे केंद्रिकरण झाले. आर्थिक विषमता पराकोटीला पोहोचली. कुटुंबाचे उदारनिर्वाह करण्यासाठी अहोरात्र कष्ट उभारूनही जनसामान्यांचे जिवन जगणे कठीण झाले.

आर्थिक विषमतेच्या बाबतीत आशिया व प्रशांत महासागरीच्या आर्थिक आयोगाने २००६ च्या वार्षिक अहवालात स्पष्ट शब्दात उल्लेख केला. की, उच्च विकासाच्या बरोबर वाढत जाणारी आर्थिक असामानता आशिया आणि प्रशांत महासागराच्या क्षेत्रातील चिंतेचा विषय बनली आहे. भारतात वेतनाच्या बाबतीतही मोठी विषमता आहे. हे खाजगी क्षेत्रातील पगारधारकांच्या पगार रचनेतही मोठी विषमता दिसून येते. भारतात खाजगी क्षेत्रातील बहूराराष्ट्रीय निगमांमध्ये कार्यरत असणाऱ्या नोकरीधारकांना अतिशय उच्च दराने वेतन मिळते. भारतीय स्टेट बँकेच्या मुख्य प्रबंधकाचा वेतन ६ लाख रूपये प्रति माह तर आई. सी. आय. सी आयच्या मुख्य किती अथक प्रयत्न करण्याची गरज आहे ह्याची प्रचिती आहे. प्रस्तुत शोधनिबंधाबाबत या सर्व बाबींचा विचार करून अर्थव्यवस्थेच्या उत्थानासाठी किती अथक प्रयत्न करावे लागणार आहे. याची प्रचिती येते. प्रस्तुत अध्ययनात भारतीय अर्थव्यवस्थेच्या संघ परिस्थितीचा विचार करण्यात आला आहे.

## बीज संज्ञा :-

जागतिकीकरण, मुक्त अर्थव्यवस्था, बेरोजगारी, दारिद्रय, विमोद्रीकरण.

## संशोधन प्रश्न :-

१) जागतिकीकरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर अनिष्ट परिणामच अधिक घडून आले.

२) कोरोना महामारीमुळे अर्थव्यवस्थेच्या आर्थिक विकासावर दुरगामी परिणाम घडून आले.

३) कोरोना महामारीमुळे आर्थिक विकासाचा दर ऋणात्मक झाला व दारिद्रयात वाढ झाली.

## संशोधन पध्दती :-

प्रस्तुत शोधनिबंध द्वितियक सामग्रीवर आधारित आहे. तथ्य संकलनासाठी विषयाशी संबंधित विविध संदर्भ ग्रंथ, क्रमिक पुस्तके, इंटरनेट, प्रकाशित व अप्रकाशित साहित्य, वर्तमान पत्रे व नियतकालिके इत्यादी माध्यमांचा वापर करण्यात आला आहे.

## जागतिकीकरणाची अगतिकता :-

भारताने १ जुलै १९९१ मध्ये जागतिकीकरण स्विकारले यामागिल भुमिकेचा आढावा घेणे अगत्याचे आहे. १९९० ला भारतीय अर्थव्यवस्थेवर मोठे संकट ओढवले व त्याचबरोबरच जगातील विकसीत राष्ट्रांचे धोरणही कारणीभूत ठरले. वास्तविक पाहता १९८० पासूनच जगात जागतिकीकरणाच्या भुमिकेचा दृष्टिकोन वाढीस लागला. अनेक विकसीत व अविकसित राष्ट्रांनी सुध्दा जागतिकीकरणाशिवाय पर्याय नाही अशी भूमिका घेतली. या भूमिकेमागे दोन कारणे होती. एक तर पाश्चात्य विकसीत राष्ट्रांनी जगातील विकसनशील व अविकसित राष्ट्रांवरील संकटांचे परिमार्जन करण्यासाठी जागतिकीकरण स्विकारल्याशिवाय गत्यंतर नाही अशी परिस्थिती निर्माण झाली या दोन्ही प्रश्नांचा विचार केल्यास जागतिकीकरणाची अगतिकता लक्षात येते. त्यातील पहले कारण म्हणजे अमेरिका, इंग्लड व विकसीत पाश्चिमात्य राष्ट्रांतील आर्थिक विकासाचा दर स्थिर झाला होता. इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीपासून तर दुसऱ्या जागतिक महायुध्दाच्या कालखंडापर्यत अमेरिका व युरोपीय विकसीत राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थांमध्ये आर्थिक स्थैर्य निर्माण झाले होते. औद्योगिकीकरणामुळे व त्यांच्या उत्पादनात अनन्यसाधारण वाढ घडून आली. वस्तु व सेवांच्या सर्व क्षेत्रात इतके उत्पादन झाले की, कोणत्या नवीन उत्पादनाच्या क्षेत्रात गुंतवणुक करावी ही समस्या या राष्ट्रांमध्ये निर्माण झाली. प्रत्येक पुरवठा स्वतःची मागणी निर्माण करते. त्यामुळे अतिउत्पादन व बेरोजगारीची समस्या निर्माण होत नाही, हा परंपरागत अर्थशास्त्र जे. बी. से. यांचा रोजगारीचा सिध्दांत अनुपयुक्त ठरला व अति उत्पादनामुळे गुंतवणुकीचा दर कमी झाला. दुसऱ्या महायुध्दानंतर लॉर्ड जे. एम. किन्स यांनी १९३५ मध्ये आपला रोजगारीचा सिध्दांत मांडुन 'से' च्या नियमातील अस्ताविकता दुर केली. किन्सने गुंतवणुकीचे विश्लेषण करतांना उपभोगप्रवृत्ती व बचत प्रवृत्ती हे दोन घटक महत्वाचे मानले. विकसीत राष्ट्रांमध्ये उत्पन्नाच्या वाढीबरोबर उपभोग प्रवृत्ती कमी कमी होते व बचत प्रवृत्ती वाढत जाते, हे उपभोगाच्या मानसशास्त्रीय नियमाच्या आधारे स्पष्ट केले उपभोग व बचत यामध्ये अंतर निर्माण होते व वाढलेली पुरेशी बचत गुंतवणुकीने भरून काढली नाही तर गुंतवणूक ऱ्हास पावत जाते. त्यामुळे उपभोग खर्च वाढविणे गरजेचे आहे, असे स्पष्ट केले. मात्र विकसित राष्ट्रांतील उपभोग अगोदरच पूर्ण झालेला असल्यामुळे वस्तु बाजारात पडून राहतात. परिणामतः अति उत्पादनाची स्थिती निर्माण होते व नफ्याची प्रेरणा कमी होऊन गुंतवणुक ऱ्हास पावत जाते. उपभोग कमी, त्यामुळे उत्पादन कमी त्यामुळे गुंतवणूक कमी म्हणून रोजगारी कमी, अशी विदारक स्थिती निर्माण होते. हा लॉर्ड किन्सचा सिध्दांत विकसीत राष्ट्रांना तंतोतत लागू पडतो.

## भारतीय अर्थव्यवस्था व मंदी :-

संघ स्थितीत भारतात मंदीची परिस्थिती आहे. त्यात कोरोनामुळे अधिक भर घातली आहे. भारतातील मंदीची दोन दृष्टिकोनातून विचार करावा लागेल. एक म्हणजे आंतरराष्ट्रीय कारण, त्यावर आपले काहीही नियंत्रण नसते. त्यात चिन आणि अमेरिका यातील व्यापार युध्द, इराकचा प्रश्न, युरोपाची अर्थव्यवस्था संकटात सापडणे, ब्रेक्झिटचा मुदा इत्यादींचा समावेश आहे. भारतीय अर्थव्यवस्था २०१६ च्या नोव्हेंबरपर्यंत सुरळीत चालत होती. उद्योगाला चालना मिळत होती. परंतु निश्चलीकरणाच्या निर्णयापासून परिस्थिती बदलली. रिझर्व्ह बँकेच्या अलिकडच्या अहवाला नुसार त्यावेळेस ज्या नोटा रद्द करण्यात आल्या होत्या त्यापेक्षा दीडपट पैसा बाजारात आहे. अर्थव्यवस्थेला दुष्टचक्र लागण्याचे हे पहिले कारण आहे. त्यातून अर्थव्यवस्थेला सावरण्यासाठी प्रयत्न सोडून वस्तू व सेवा कर आणला. त्यात सहा कराचे टप्पे आणले. तिथपासून जीएसटीच्या गोंधळाला सुरुवात झाली. या दोन कारणांचा

उद्योग क्षेत्राला पडलेला फटका अजूनही सावरता आला नाही. जागतिक बँकेच्या २०१८ च्या क्रमवारीनुसार भारतीय अर्थव्यवस्था सहाव्या क्रमांकावरून घसरून सातव्या क्रमांकावर आली. २०१७ च्या क्रमवारील भारतीय अर्थव्यवस्थेचे आकारमान २.५६ ट्रिलियन डॉलर्स होते. यामध्ये २०१८ मध्ये वाढ होऊन आकडा २.६३ ट्रिलियन डॉलर्स झाला. पण क्रमावारीत मात्र भारताची घसरण झाली याचे कारण म्हणजे फ्रान्स आणि ब्रिटनची अर्थव्यवस्था भारतीय अर्थव्यवस्थेच्या तुलनेत अधिक सक्षम स्थितीत राहीली. भारत ब्रिटनला मागे टाकून पाचव्या क्रमांकावर जाईल असे बोलले जात होते. पण ब्रिटन आणि फ्रान्सने भारताला सातव्या क्रमांकावर ढकलले.

## कोरोना महामारीमुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेले परिणाम :-

चीनच्या वुहान शहरातून निर्माण झालेल्या 'कोरोना' वायरसने संपूर्ण जगाला वेढून टाकले आहे. भूतलावर असा कोणताही देश शिल्लक उरला नाही की, ज्या देशामध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव झाला नाही. ३० जानेवारी २०२० मध्ये भारतामध्ये कोरोना धडकला. या व्हायरसच्या दहशतीमूळे शेअर मार्केट मीडियाच्या अहवालानुसार जगभरातील एअर लाइन्सने चीनसह अनेक शहरांमध्ये आपल्या सेवा बंद केल्या. याचा परिणाम चीन, दक्षिण कोरिया, ऑस्ट्रेलिया या भागातील शेअर बाजारावर दिसून आला. तज्ज्ञाच्या मते, चीनसह जागतिक अर्थव्यवस्थेवर याचा नकारात्मक परिणाम होईल. जागतिक अर्थव्यवस्था कठिण काळातून जात असतानांचा कोरोनाचा संसर्ग सुरू झाल्यामुळे चालु आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तिमाहित अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणावर संकटात होईल असे मत आर्थिक सहकार्य व विकास संघटनेने (ओईसीडीने) व्यक्त केली होती. कोरोना विषाणूचा संसर्ग चीन बाहेर अनेक देशांत होत असल्याने आर्थिक सहकार्य व विकास संघटनेने याबाबत तीव्र चिंता व्यक्त केली. या अधिकाच्या दशकामध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर आर्थिक संकट आले होते, अशा स्थितीत कोरोनामुळे दुसरे आर्थिक संकट येऊन जागतिक आर्थिक संकटात अधिकच भर पडली. सुरूवातीच्या काळात इटली, ब्राझील, अमेरिका, दक्षिण कोरिया इत्यादी देशांच्या तुलनेत भारतामध्ये कोरोनाचा प्रार्दुभाव संथ गतीने राहीला. परंतु हळुहळु या संकटाने आपले पाऊल घट्ट करण्यास सुरूवात केली. सध्या भारतात कोरोना बाधितांची संख्या कमी राहिली असली तरी आज ब्राझीलला मागे टाकून भारताने जगात दुसरे स्थान गाठले आहे.

## निष्कर्ष :-

१. भारताने जागतिकीकरण स्विकारण्यापूर्वी जागतिकीकरणाला अनुकुल परिस्थिती निर्माण करावयास हवी होती. चीन सरकारने आपल्या अर्थव्यवस्थेला अशाप्रकारे नियंत्रीत करूनच जागतिकीकरणाचा स्विकार केला. चीनमध्ये जागतिकीकरण यशस्वी होण्याचे ते प्रमुख कारण ठरले आहे.
२. खाजगीकरणाच्या संकल्पनेखाली निर्गुंतवणुकीचे धोरण योग्य रीतीने राबविण्यात येत नाही. अनेक सार्वजनिक मत्ता अल्प दरात विकून भांडवलदारीला अधिकच मजबूत करण्याचा प्रयत्न होत आहे.
३. सार्वजनिक उद्योगधंदयाचे खाजगीकरण केले जात असल्यामुळे सार्वजनिक उद्योगातील नोकरधारकांचे काय ? सरकारने या विषयीचे योग्य धोरण आखले नसल्यामुळे बेरोजगारीत पून्हा भर पडत आहे.
४. भांडवलशाहीच्या जागतिकीकरणामुळे भारतीय समाजव्यवस्थेत श्रीमंत - गरीब असे दोन वर्ग पडून दारिद्रिय व भुखमारी वाढत आहे.

५. जागतिकीकरण स्वीकारल्यानंतर २०१६ पर्यंत राष्ट्रीय उत्पन्नाचा दर वाढत जाऊन ९ टक्क्यापर्यंत होणे ही जागतिकीकरणाच्या सफलतेची वाटचाल असली तरी त्यानंतर आर्थिक विकास दरात निरंतर घट होत गेली व जानेवारी २०२० मध्ये ०.२ टक्केपर्यंत कमी झाली. हे वर्तमान सरकारच्या नीती व धोरणांची असफलता दर्शविणारी बाब आहे.

६. जागतिकीकरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत प्रचंड आर्थिक विषमात निर्माण होऊन बेरोजगारी, दारिद्रिया इत्यादीमध्ये सातत्याने वाढ होत आहे.

७. भारतीय अर्थव्यवस्था मंदीच्या चक्रव्यूहात सापडली असताना कोरोना महामारीमुळे अर्थव्यवस्थेतील मंदीची तिव्रता अधिकतच वाढत गेली आहे.

८. कोरोना महामारीमुळे आर्थिक विकास दर ऋणात्मक होऊन अर्थव्यवस्थेतील आर्थिक संकटाला आणखी गडद करण्यास कारणीभूत ठरली आहे.

९. कोरोना महामारीचे प्रमाण कमी करण्यासाठी कोरोना बाधित ऋग्णाच्या तपासणीचे प्रमाण बनविले पाहिजे. दक्षिण कोरीयाने याप्रकारचा उपाय करूनच कोरोना समस्येवर मात केली.

**समारोप** :-

संविधानकर्त्यांनी राज्य घटनेमध्ये समाजवादी समाजरचनेचा पुरस्कार केला मात्र जागतिकीकरणामुळे देशात समाजवादी समाजरचनेचा विसंगत मुक्त व्यापार व भांडवलशाहीचे प्रारूप स्विकारण्यास बाध्य केले. त्यामुळे भांडवलशाहीतील सर्व दुर्गूण भारतीय समाजव्यवस्थेत असलेली वर्णव्यवस्था व जातीव्यवस्था देशाच्या सर्वांगिण विकासाला बांधक ठरली होती. त्यात जागतिकीकरणामुळे अधिकच भर पडली आहे. जागतिकीकरणाचे दुष्परिणाम अनुसूचित जाती - जमाती व इतर मागासवर्गीयांच्या विकासावर तर दिसत आहेतच परंतु भारतीय समाजव्यवस्थेत गरीब - श्रीमंत असे दोन वर्ग निर्माण होऊन आर्थिक विषमताही पराकोटीला पोहोचली आहे. दारिद्रिय, बेकारी, प्रचंड वाढत आहे. हे कल्याणकारी राज्यनिर्मितीस विघातक असून समाज स्वास्थ्यासाठी घातक आहे. यास्तव जागतिककरणाची दिशा व वाटचाल बदलण्याची गरज आहे. भारतासारख्या विशाल लोकसंख्येच्या देशात रोजगारीची पातळी सतत वाढविण्यासाठी सार्वजनिक क्षेत्राचे अस्तित्व महत्वाचे आहे. रोजगार पातळी वाढविण्यासाठी सरकारने सार्वजनिक क्षेत्रावर मोठा खर्च करणे आवश्यक आहे. कारण रोजगारीची लवचिकता सार्वजनिक उद्योगधंदयामध्ये जास्त आहे. सरकारच्या निगुंतवणूकीच्या धोरणामुळे खाजगी उद्योगधंदयांना अधिकच चालना मिळत आहे. त्यामुळे रोजगारीचा मोठा प्रश्न झाला आहे. सध्याच्या स्थितीत सार्वजनिक क्षेत्रात रोजगार लवचिकता ऋणात्मक झाली आहे. ही चिंतेची बाब आहे. राजकारण आणि अर्थकारण यात मूलभूत फरक आहे. म्हणुन सरकारने राजकीय दृष्ट्या घेतलेले निर्णय ताबडतोब अर्थकारणावर पडत नाही. सरकारने त्यातील समयातराचा विचार करूनच राजकीय धोरण आखले पाहिजेत. परंतु वर्तमान सरकारच्या धोरणात ही बाब लक्षात घेतली जात नाही असे दिसून येते. त्यामुळे सरकारची अर्थव्यवस्थेवरील पकड सैल होत आहे. व आर्थिक विकासाचा दर मंदावत आहे. त्यात कोरोना महामारीने अधिकच भर पडून आर्थिक विकास दर ऋणात्मक झाला आहे. या संकटावर मात करून देशाची अर्थव्यवस्था कधी मुक्त होणार हे येणारा काळच ठरविणार आहे. त्यासाठी अतिशय कुशल व दक्ष सरकारच भारताला जागतिकीकरणाचे अपयश, मंदीचे दुष्टचक्र व कोरोना महामारीचे संकट यातून सोडवू शकते, असा आशावाद व्यक्त करणे हे परिस्थिती सापेक्ष ठरणार आहे.

## संदर्भसुची :-


१) प्रा. डॉ. सिध्दार्थ एस. मेश्राम

२) www.bbc.com.in>india

३) October - 2020

# भारतीय स्वातंत्र्य लढयात राणी लक्ष्मीबाईचे योगदान

कु. रोहिणी रामभाऊ उईके
महिला महाविदयालय नंदनवन
नागपूर (वर्ग B.A. 3rd year)

## प्रस्तावना :—

राणी लक्ष्मीबाईच्या व्यक्तित्वाचा शोध घेताना आपल्या इतिहासातील इतर कर्तृत्ववान शूर स्त्रियांची आठवण येणे अपरिहार्य आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची सून राजारामची विधवा पत्नी ताराराणी इंदूरच्या मल्हारराव होळकरांची विधवा सून अहिल्याबाई आणि कित्तूर संस्थानची विधवा राणी चिन्नमा या तिघांची नावे प्रामुख्याने आठवतात. या सगळयाजणी विधवा होत्या हे सर्वप्रथम लक्षात येते ताराराणी अहिल्याबाईचा लढा स्विकीयाबरोबरच होता. तर राणी चिन्नमा आणि राणी लक्ष्मीबाई यांच्यामध्ये खूप साम्य आढळते. या दोघी इंग्रजाविरूध्द कंपनी सरकारच्या अन्यायाविरूध्द लढल्या या दोघींच्या दत्तकाचा हक्क कंपनी सरकारने नाकारला होता. चिन्नमाला पती—निधनानंतर दत्तक घेण्यास सरकारने बंदी घातली आणि कित्तूरवर कब्जा करण्याचा प्रयत्न केला.

'सिंहासन हिल उठे राजवंशो ने भुकुटी तानी बूढे भारत मे भी आई फिर से नयी जवानी थी'। झाशी बुंदेलखंडातील एक अतिशय महत्वाचे शहर पुष्पावती (लोकभाषेत पहूज) आणि वेत्रवती (बेटवा) या नदयाच्या असलेले झाशी हे शहर शौर्य आणि स्वाभिमानाचे प्रतिक बनले आहे ते झाशीच्या राणी लक्ष्मीबाईमुळेच

दिख गई पथ, सिखा गयी हमको जो सीख सिखानी थी।
बुन्देल हरबोली के मुख हमने, सुनी कहानी थी।
खूब लडी मर्दानी वह तो झासीवाली रानी थी।

राणी लक्ष्मीबाईने आपल्या अद्वितीय साहस आणि पराक्रमाने केवळ इतिहास रचला नसून प्रत्येक स्त्रीच्या मनात साहस आणि ऊर्जेचा संचार घडवला आपल्यातील पराक्रमाने कित्येक राजांना पराजित केल आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी इंग्रजांना लडवी झुंज देत इतिहासाच्या पानामध्ये आपली विजयगाथा सुवर्णाक्षरांनी लिहिली. लक्ष्मीबाईनी आपल्या झाशीला वाचविण्यासाठी ब्रिटीशाशी लढण्याचे अतुलनीय साहस दाखवले आणि झुंजार लढवण्याचे मरण स्विकारले तिच्या पराक्रमी इतिहासाचे स्मरण आज देखील अभिमानाने केले जात. राणी लक्ष्मीबाईने आपल्या बलिदान आणि पराक्रमाने केवळ भारतीय स्त्रीच नव्हे तर समस्त देशातील स्त्रीयांची मान अभिमानाने उंच केली आहे. राणी लक्ष्मीबाईच जीवन देशभक्ती आणि बलिदानाची एक अनुपम गाथा आहे.

## राणी लक्ष्मीबाईचे प्रारंभिक जीवन :

राणी लक्ष्मीबाईचा जन्म 19 नोव्हेंबर 1828 ला उत्तर प्रदेशातील वाराणसी येथे भदैती नगर इथे झाला. बालपणी त्यांना मणिकर्णिका प्रेमानं म्हटल जाई. त्याचे वडील मोरोपत तांबे बिठुर न्यायालयात पेशवा होते, लक्ष्मीबाईचे वडिल आधुनिक विचारसरणीचे होते मुलींना समाजात स्वातत्र्य व शिक्षण मिळायला हवं यावर त्याचा विश्वास होता.

आपल्या वडिलांच्या या विचारांचा लक्ष्मीवर प्रभाव होता. लक्ष्मीबाईमधील प्रतिभा मोरोपत यांनी बालपणीचे ओळखली होती आणि त्यामुळे त्या काळातील इतर मुलींच्या तुलनेत आधिक स्वातंत्र्य दिल्या गेले होतं, लक्ष्मीबाई अवघ्या 4 वर्षाच्या असतांना त्याच्या आई भागीरथी बाईच निधन झाल त्यामुळे त्याचा सांभाळ मोरोपतांनी केला मारोपंत तांबे बाजीराव पेशव्यांच्या सेवेत असतांना एका ज्योतिष्याने लक्ष्मीबाईच्या जन्मावेळी भविष्यवाणी केली होती की ती मोठी होऊन ही मुलगी साम्राज्याची राणी होईल. आणि झाले देखील तसेच पुढे लक्ष्मीबाई झाशीची राणी झाल्या आणि आपल्यातील दुर्दम्य साहस आणि पराक्रमाने सर्वासमोर उदाहरण ठरल्या शिक्षणासोबत त्यानी आत्मरक्षा, घोडस्वारी, धनुर्विदया याच देखील प्रशिक्षण घेतल आणि त्यामुळे त्या शस्त्रविदयेत प्रवीण झाल्या.

## लक्ष्मीबाईचं बालपण

मणिकर्णिका बालपणापासून दिसायला इतकी सुंदर होती की कोणीही तिचं कौतुक केल्याशिवाय तिच्याशी बोलल्याशिवाय राहू शकत नव्हते तिचे वडिल तिला कौतुकाने छबिली म्हणत असत तिच्या आईच्या मृत्यूनंतर मोरोपंत तिला बाजीराव पेशव्यांच्या बिठूरला घेऊन गेले.

या ठिकाणी बाजीराव पेशव्याच्या मुलांसोबत तिच बालपण व्यक्तित झालं. ते सगळे बहिण–भावांसारखे एकत्रित राहिले एकत्र खेळण अभ्यास करणं, याशिवाय येथे धनुर्विदयेत, आत्मरक्षेचे त्यांनी धडे गिरवले त्या शस्त्रविदयेत पारंगत होत गेल्या आणि उत्तम घोडेस्वार देखील झाल्या.

## राणी लक्ष्मीबाईमधील कौशल्य :

1) आपल्या प्रजेप्रती त्यांना फार प्रेम आणि वात्सल्य ही त्या प्रजेची फार काळजी घेत असत.

2) गुन्हेगारांना योग्य शिक्षा देण्याची त्याच्यात हिम्मत होती.

3) सैन्य कार्यात त्या कायम उत्साही असत या कार्यालयात त्या निपुण देखील होत्या. लक्ष्मीबाईना घोडयांची चांगली पारख होती. मोठे–मोठे राजे देखील त्यांच्या घोडेस्वारीच कौतुक करत असत.

## नानासाहेब पेशव्यांचे लक्ष्मीबाईना आव्हान

लक्ष्मीबाईचे पराक्रमाचे किस्से बालपणापासून घडत होते. मोठमोठया आव्हानांना सुध्दा त्या लीलया पार पाडत असत. एकदा नानासाहेबांनी लक्ष्मीबाईना आपल्यासोबत घोडेस्वारिच आव्हान दिल लक्ष्मीबाईनी हे आव्हान अगदी हसत हसत स्विकारल आणि नानासाहेबांना या स्पर्धेत हरवले देखील लक्ष्मीबाईची घोडयाला पळवण्याची प्रतिभा पाहून त्यांनी लक्ष्मीबाईच कौतुक केल आणि शाबासकी दिली.

नानासाहेबांनी लक्ष्मीबाईना तलवार चालवणे, भाला चालविणे, बंदुकीने निशाणा लावणे चा गोष्टी शिकविल्या कुस्ती मलखाब सारखे व्यायाम लक्ष्मीबाईना आवडत असत.

## राणी लक्ष्मीबाईचा विवाह

वयाच्या अवघ्या 14 व्या वर्षी त्याच्या विवाह उत्तर भारतातील झाशीचे महाराज गंगाधराव नेवाळकरांनी यांच्याशी झाला. आणि मनु झाशीची राणी लक्ष्मीबाई झाली वैवाहिक जीवन सुखान व्यक्तीत होत असताना त्यांना 1851 साली पुत्ररत्न प्राप्त झाल, त्याच नाव दामोदरराव असं ठेवण्यात आलं.

परंतु हे बाळ अल्पायुषी ठरल 4 महिन्याच असतांना या बाळाचा मृत्यू झाला. कुटुंबावर दुःखाची छाया पसरली. पुत्रवियोगामुळे गंगाधरराव आजारी राहू लागले. पती, पत्नी दोघांनी नातेवाईकांच्या मुलाला दत्तक घेण्याचा निर्णय घेतला. मुलाच्या दत्तकविधान ब्रिटीश अधिकाऱ्याचा उपस्थितीत करण्यात आला जेणेकरून पुढे या निर्णयावर त्यांचा विरोध नसावा दत्तक घेतलेल्या मुलाचे नाव पूर्वी आनंदराव असे होते जे पुढे बदलून दामोदर असे ठेवण्यात आले.

सतत आजारी असल्याने अखेर 21 नोव्हेंबर 1853 साली महाराज गंगाधरराव नेवळकरांचे निधन झाले. त्यावेळी लक्ष्मीबाई केवळ 18 वर्षाच्या होत्या. पुत्रावियोगामुळे दुःखात असलेल्या लक्ष्मीबाईवर पती निधनामुळे जणु आभाळच कोसळलं. परंतु स्वतःला सावरत त्यांनी राज्यकारभाराची सुत्रे हाती घेतली. दत्तक पुत्र दामोदरराव लहान असल्याने लक्ष्मीबाईंनी राज्यकारभार चालविण्याचा निर्णय घेतला.

## राणी लक्ष्मीबाई उत्तराधिकारी झाल्याचा ब्रिटीशांनी केला विरोध

राणी लक्ष्मीबाई या अत्यंत धैर्यवान आहे. साहसी होत्या प्रत्येक निर्णय त्या फार समजसपणे घेत असत. लक्ष्मीबाईनी ज्यावेळी राज्यकारभाराचा सूत्र आपल्या हाती घेतली त्यावेळी असा नियम होता कि कोणत्याही राजाचा मृत्यू झाल्यास त्याचा स्वतःचा मुलगा उत्तराधिकारी होईल परंतु जर पुत्र नसेल तर ते राज्य पुर्णतः ईस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यात जाईल या निर्णयमुळे लक्ष्मीबाईना उत्तराधिकारी होण्यासाठी मोठया संघर्षाचा सामना करावा लागला.

गंगाधरावांच्या मृत्यू पश्चात ब्रिटीशांनी झाशीवर ताबा मिळविण्यासाठी बरेच प्रयत्न केले, दत्तक पुत्रावर खटला देखील भरला, राज्याची सगळी संपत्ती देखील जप्त केली. गंगाधरावांना घेतलेल्या कर्जाला लक्ष्मीबाईच्या मिळकतीतुन कापण्यास सुरूवात केली त्यामूळे लक्ष्मीबाईना झाशीचा किल्ला सोडून राणी महालात जावे लागले. या संकटामुळे राणी लक्ष्मीबाई घाबरल्या नाहीत. राज्य ब्रिटीशाच्या ताब्यात जाऊ दयावे नाही. या आपल्या निर्णयावर ते त्या ठाम राहिल्या. कसेही करून आपले राज्य वाचवायचच या निर्धाराने त्यांनी सैन्य संघटन करण्यास सुरूवात केली.

## ''मेरी झाशी नही दूंगी'' पराकमी लक्ष्मीबाईचा संघर्शाला सुरूवात

झाशी ताब्यात घेण्याचा चंग बांधलेल्या ब्रिटीशांनी 7 मार्च 1854 त्या सरकारी आदेश काढल्या ज्या झाशी राज्याला ब्रिटीश साम्राज्यात समाविष्ट करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. राणीलक्ष्मीबाईने या आदेशाचे उल्लंघन करत मै अपनी झाशी नही दुंगी असे ब्रिटीशांना कळविले आणि त्यांचा विरोधात संघर्ष अधिक तिव्र केला.

लक्ष्मीबाईने इतर राज्याच्या मदतीने सेना तयार केली. या सैन्येत लोकांनी मोठया उत्साहाने आपला सहभाग नोंदवला या सैन्यात महीलांचा देखील प्रमाणात सहभाग होता. त्यांना युध्दाचे विशेष प्रशिक्षण दिल्या गेले. लक्ष्मीबाईच्या या सैन्यात युध्दकुशल आणि विद्वान असे गुलामजान, दोस्त खान, सुंदर, काशीबाई, मोतिबाई, लालभाऊ बक्शी, दीवाण रघुनाथ सिंह, दिवान जवाहर सिंह यांचे सह 1400 सैनिक सहभागी होते.

## 1857 च्या स्वातंत्र्य संग्रामात राणी लक्ष्मीबाईची भुमिका

10 मे 1857 ला इंग्रजाच्या विरोधात विद्रोहाच्या ठिणगीने चांगलाच पेट घेतला होता या दरम्यान बंदुकीच्या गोळयामध्ये डुकराची आणि गायीची चरबी वापरली जात असल्याने हिंदु धर्मियांच्या भावना दुखावल्या गेल्या आणि संपुर्ण देशात ब्रिटीशांविरोधात संघर्षाने पेट घेतला. त्यामुळे ब्रिटीशांनी नाईलाजाने या प्रकरणाला दाबले आणि झाशीच्या लक्ष्मीबाईना त्याचे राज्य सुपूर्त केले. त्यानंतर 1857 साली शेजारच्या ओरछा आणि दतिया येथील राजांनी झाशीवर आक्रमण केले, परंतु मोठया शौऱ्याने राणी लक्ष्मीबाईने आपल्या पराक्रमाचा परीचय देत विजय प्राप्त केला.

## 1858 साली इंग्रजांचे पून्हा झाशीवर आकमण

1) झाशी मिळवण्याच्या हट्टाने पेटलेल्या ब्रिटीशांनी पून्हा हल्ला केला परंतु यावेळी तात्या टोपेच्या नेतृत्वात 20,000 सैनिकांनी त्यांच्याशी युध्द पुकारले हे युध्द त्यावेळी जवळपास 2 आठवडे चालले.
2) इंग्रजांनी किल्याची भिंत तोडून कब्जा मिळवला लुटमार सुरू केली.

3) परंतु यावेळी देखील राणी लक्ष्मीबाई संय्यमाने परिस्थिती हाताळुन दामोदर रावाचा जिव वाचवला 1858 साली ब्रिटीशाने झाशी आपल्या ताब्यात घेतल्यानंतर राणीलक्ष्मीबाई या आपल्या सैन्यासह ग्वाल्हेर येथे पोहचल्या.

4) राणी लक्ष्मीबाईने तात्याटोपेच्या मदतीने ग्वायियरच्या राजा विरूध्दात युध्द केले विजय प्राप्त केले.

5) परंतु त्यानी ग्वालियरचे राज्य पेशवांच्या हाती सुपुर्त केले.

## राणी लक्ष्मीबाईच्या मृत्यू

1) 17 जुन 1858 ला राणी लक्ष्मीबाईंनी किंग्स रॉयल आयरिश विरोधात युध्द पुकारले आणि पुर्व क्षेत्रातील ग्वालीयरचे नेतृत्व केले या युध्दात त्यांच्या महिला सेविकांनी देखील त्यांना चांगली साथ दिली गेल्या युध्दात राणीचा घोडा 'राजरतन' मारला गेल्याने या युध्दावेळी त्यांचा घोडा नविन होता. या युध्दा दरम्यान राणीलक्ष्मीबाईंना हे आपले अखेरचे युध्द असल्याची जाणीव झाली.

2) पुरूष पोषाख परिधान केल्यान इंग्रज लक्ष्मीबाईंना ओळखू शकले नाही. त्यांना युध्द भुमिपर सोडुन गेले.

3) राणी लक्ष्मीबाईंचे सैनिक त्यांना गंगादास याच्या मठात घेऊन गेले आणि त्यांना गंगाजल पाजले.

4) ''कोणताही इंग्रज मला माझ्या देहाला स्पर्श करणार नाही'' ही आपली अखेरची ईच्छा त्यांनी व्यक्त केली.

5) 17 जुन 1858 ला कोटा येथील सराई नजीक ग्वालीपार मथल्या फुलबाग येथे लक्ष्मीबाईला वीरगती प्राप्त झाली.

अशा झुंजार राणीमुळे भारताची मान कायम गर्वाने उच्च राहीले राणी लक्ष्मीबाई प्रत्येक भारतीय स्त्रिसाठी प्रेरणात्सोत ठरली आहे.

सिंहासन हील उठे, राजवंशेने भुकुटी तानी थी।
बुढे भारत मे भी आई फिर से नई जवानी थी।
गुमी हुई आजादी की किंमत सबने पहचानी थी।
दुर फिरंगी को करने की, सबने मन मे ठाणी थी।
चमक उठी सन सत्तावन मे, वह तलवार पुरानी थी।
बुंदे ले हर बोलो के मुह हमने सुनी कहानी थी।
खुब लडी मर्दानी वह, तो झाशी वाली राणी थी .........।

## संदर्भ साधने


1) आधुनिक भारताचा इतिहास – नी. सी. दिक्षित
2) भारताचा इतिहास – डॉ. विभा अनिल आठल्ये
3) झाशीची राणी लक्ष्मीबाई – प्रतिभा रानडे, जून 2023 प्रथम आवृत्ती
4) झाशीची राणी लक्ष्मीबाई – वि. श्री. पुराणिक
5) ब्रिटीश रियासत, खंड 2 – गो. स. सरदेसाई 1993

# विदर्भातील आंबेडकरी चळवळीमध्ये दलित स्त्रियांचे योगदान

नाव :— प्रियंका तुलाराम अडिकणे
वर्ग :— **B.A. 3rd Year**
महिला महाविद्यालय नंदनवन नागपूर

## प्रस्तावना :—

आधुनिक भारताच्या इतिहासात अनेक समाज सुधारकांनी सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी सामाजिक चळवळी उभारण्याचे संदर्भ मिळतात. परंतु एखादया समाज सुधारकांच्या नावावर एखादया चळवळीचे नामाभिधान झाल्याचे संदर्भ क्वचितच मिळतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वात झालेली किंवा त्यांच्या विचारांशी अभिप्रेत असलेली चळवळ ही सामाजिक चळवळीच्या इतिहासात आंबेडकरी चळवळ म्हणून प्रसिध्द पावली आहे. समाजातील दलित — पिडीत अस्पृश्य शेतकरी शेतमजूर कामगार वर्गाला यांचे अधिकारी मिळवून देणे हे या चळवळीचे उदि्दष्यच होते आंबेडकरी चळवळ म्हणजे माणवाला मानवाचे माननिय अधिकार मिळवून देणारी मानवी हक्काची चळवळ होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर येथे 8 ते 9 ऑगस्ट 1980 रोजी अखिल भारतीय दलित कॉग्रेसचे पहिले अधिवेशन आयोजित करण्यात आले. या अधिवेशनात दलित महिला परीषद सुध्दा भरविण्यात आली. या दलित महिला परिषदेच्या अध्यक्षस्थानी पुण्यात सौ. गुणाबाई गडेकर हया होत्या. अमरावतीच्या सौ. शेवताबाई ओगल स्वागताध्यक्ष तर सचिव म्हणून नागपूराच्या सौ. तुळसाबाई बंदसोडे पाटील व जाईबाई चौधरी त्याचप्रमाणे अकोल्याच्या सौ. काशीबाई मांडवधरे या परीषदेचे काम पाहत होत्या. महिलांना समाजाच्या चळवळीमध्ये सहभागी करून घ्यावे हा डॉ. बाबासाहेबाचा आधिपासुनच मुख्य हेतु होता. महाडच्या सत्याग्रहाचा वेळी महिलांना मार्गदर्शन करीत असताना त्यांनी तसे आवाहन सुध्दा केले होते. त्यामुळे आंबेडकरी चळवळीमध्ये महिलाचा सहभाग वाढत होता. आंबेडकरी चळवळीतील मुख्य सभा संमेलने, अधिवेशने, परिषदा बरोबरच महिलांसाठी सुध्दा अशा सभा संमेलन व परीषदेचे आयोजन केल्या जात होते. नागपूर येथील या पहिल्या महिला परिषदेतील सुध्दा महिलांचा सक्रिय सहभाग होता.

इ. स. 1932 मध्ये नागपूर जवळील कामठी येथे झालेल्या अखिल भारतीय कॉग्रेसच्या अधिवेशनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अखिल भारतीय डिस्प्रेस्ड क्लासेस फेडरेशनची स्थापना केली होती. या फेडरेशनच्या प्रांतिक महिला संघटना म्हणून नागपूरच्या कु. विरेद्राबाई तीर्थकर हया कार्य करीत होत्या. त्या मध्यप्रांत वऱ्हाड दलित फेडरेशनच्या एक प्रांतिक सेक्रेटारी सुध्दा होत्या. आंबेडकरी चळवळीच्या कार्यात त्यांनी बरीच वर्षे कार्य केले.

दलित महिला वर्गाच्या जागृतीचा परिणाम म्हणजे दलित महिला संघटित होवू लागल्या. महिलांची मंडळे तयार होऊ लागली अमरावती येथे 12 जानेवारी 1933 रोजी महिला मंडळे स्थापना झाली. यात समरताबाई सावंतराव तायडे, गंगुबाई, मेश्राम बडनेरा, मधुराईबाई, तुळशीबाई थुल, यांचा समावेश होता. या महिला मंडळाने खेडयापाडयातील दलित महिलांना जागृत केली. अमरावतीच्या महिला चळवळीमध्ये सौ. सुलोचना, डोंगरे, सौ. लक्ष्मीबाई संपतराव नाईक, दत्तुजी बाबलाची इंगोले मास्तर यांचा पत्नी संक्रीय होत्या त्याचबरोबरच यवतमाळ येथील बोरकर कुटुंबातील स्त्रिया, पाटील पुण्यातील स्त्रिया चिरवली येथील इंगोलेबाई इ. स्त्रिया त्या काळात विदर्भातील आंबेडकरी चळवळीत सक्रीय होत्या. मलकापूर येथे 28 मार्च 1934 रोजी बुलढाणा जिल्हा अस्पृश्य महिला परिषद आयोजित करण्यात आला. मिसेस कमलाबाई रेगे या हया परिषदेच्या स्थायी अध्यक्ष होत्या. या परिषदेत मंदीर प्रवेश बील या सारख्या ठरावावर कमलाबाई इंगळे, राईबाई, केसरबाई तायडे, सखुबाई, तायडे भिकाबाई वाघ, अहिल्याबाई, काशीबाई, भगत भारजाबाई भगत, राधाबाई तयाडे सखुबाई, सिंधीबाई, चिधीबाई वाघ, इ. चे भाषणे झाली एप्रिल 1934 मध्ये तुमसर, जि. भंडारा येथे अस्पृश्य महिलांची सभा सौ. सुभद्राबाई रामटेके यांचे अध्यक्षतेखाली झाली होती.

1 मार्च 1936 रोजी पाचपावली नागपूर येथे जिल्हा दलित महिला परीषद सौ, भागीरथीबाई थोरात यांच्या अध्यक्षतेखाली झाली या परिषदेत बाबासाहेबाच्या धर्मातराच्या घोषणेस पाठींबा देण्यात आला.

सौ. अंजनीबाई देशभ्रतार यांनी नागपूर मध्यप्रात अस्पृश्य विदयार्थीनीचे संमेलन 24 व 25 मे 1936 मध्ये आयोजित केले. सौ. यशोदाराबाई डहाट या संमेलनाच्या स्वागताध्यक्ष होत्या. या संमेलनात अमरावतीच्या अनुसयाबाई खडसे शांताबाई बारसे, गंगुबाई सोनोने, वेणुबाई इंगोले, चंद्रभागा, भालचंद्र,

शांताबाई ढमढेरे, अकोल्याचा सौ. मनोरमाबाई जाधव मेहरकरच्या गयाबाई सपकाळ, वाईच्या मनकरणीबाई, पव्वखेडच्या कुमारी लक्ष्मीबाई, इ, स्त्रियाचा संक्रिय सहभाग दिसुन येतो. 6 ऑगस्ट 1936 मध्ये नागपूर येथे अस्पृश्य सुधारक लग्न सहाय्यक मंडळ स्थापन करण्यात आले. या संस्थेच्या सहसचिव म्हणून सौ. अंजनीबाई देशभ्रतार तर सदस्य म्हणून कु. विरेन्द्राबाई तीर्थकर व सौ. द्रोपदीबाई साखरकर या कार्यरत होत्या.

नागपूर मधील धरमपेठ येथे 1 जानेवारी 1938 रोजी श्रीमती सखुबाई मेश्राम यांच्या अध्यतेखाली अस्पृश्य महिलांची सभा आयोजित करण्यात आली. सौ. अंजनाबाई देशभ्रतार यांनी यावेळी आपले विचार व्यक्त केले. आपल्या भाषणात त्या म्हणाल्या अस्पृश्य समाजातील बायांनी आपली संपूर्ण सुधारणा व उन्नती करून घ्यायची असल्यास आपणास स्वाभिमानाची व स्वावलंबानाची चळवळ करून समाजाचे निस्वार्थपणे कार्य केले पाहिजे दुसरे लोक आपली सुधारणी करतील ही भ्रामक कल्पना सोडून दिली पाहिजे. आणि आपल्याच पायावर उभे राहून स्वतःची आपल्या कुटुंबाची व समाजाची सुधारणा करणे आवश्यक आहे. या सभेत श्रीमती रमाबाई आंबेडकर महिला संघ ही संस्था स्थापन करण्यात आली. दि. 20 एप्रिल 1940 रोजी उमरेड तालुका महिला परिषद करण्यात आली. या परीषदेच्या अध्यक्षस्थानी अमरावतीच्या सौ. सुलोचनाबाई डोंगरे होत्या. अस्पृश्य महिलांची समता सैनिक दल स्थापन करावी. असेम्ब्लीमध्ये अस्पृश्य महिलांसाठी राखीव जागा असाव्यात. हे ठराव परित करण्यात आले. 1 कामठी येथे दि. 2 नोव्हेंबर 1940 रोजी अस्पृश्य महिलांच्या सभेत भगिनी मंडळे कामठी या संस्थेची स्थापना करण्यात आली. हया संस्थेच्या अध्यक्ष भागाबाई मानवटकर व सचिव सौ. जानकी बाई मानवटकर तर सहसचिव सौ. द्रोपदाबाई डहाट होत्या. अस्पश्य समाजातील स्त्री वर्गात शैक्षणिक दर्जा उंचावण्याकरिता सौ. जाईताई चौधरी यांनी अस्पृश्य मुलीची प्राथमिक शाळा स्थापन करून दलित स्त्री वर्गात शैक्षणिक जागृती करण्याचा प्रयत्न केला आंबेडकरी चळवळीमध्ये शांताबाई दाणी यांचे सुध्दा महत्वपूर्ण योगदान आहे. 1947 च्या ऑक्टोबर महिन्यात विदर्भातील यवतमाळ, चांदा, नागपूर, अमरावती अशा अनेक ठिकाणी रझाकारो करण्यासाठी कु. शांताबाई दाणी यांनी दौरे काढला त्यावेळी हेर समजून अटक करून जबलपूरच्या तुरूंगात ठेवले होते.

यवतमाळ जिल्हात अस्पृश्यांना हॉटेलमध्ये प्रवेश मिळवून समानतेची वागणूक देण्यासाठी चळवळ करण्यात आली. या चळवळीत सुध्दा स्त्रियांनी संक्रीय सहभाग दर्शविला. पुरूषांच्या बरोबरीने सौ. वत्सलाबाई सिरसाट दारव्हा या अस्पृश्य महिलेने या चळवळीने हिरीरीने भाग घेतला. नलिनीताई लढके यानी सुध्दा विदर्भातील अनेक ठिकाणी सभेत भाग घेवून महारांनी महारवतने आणि निचकामे सोडून व्यवसाय बदल करविण्यासाठी मोलाचे मार्गदर्शन केले.

14 ऑक्टोबर 1956 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर येथे आपल्या लाखो अनुयायासह बौध्द धम्माची दिक्षा घेतली. या दिक्षा समारंभाच्या प्रसंगी अनेक स्त्रियांनी मोठया संख्येने धम्मदीक्षा घेतली. अमरावती येथील संपतराव गणवताराव नाईक यांच्या पत्नी श्रीमंती लक्ष्मीबाई नाईक यांनी बौध्द धम्माची दीक्षा घेतली तसेच बडनेरा येथील दलीत पुढारी सुदामजी वाघमारे यांच्या पत्नी सौ. सुशिला वाघमारे सुध्दा या दिक्षा समारंभात सहभागी झाल्या होत्या.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्त्री–पुरूष समानतेचे पुरस्कर्ते होते. स्त्रियांनी सुध्दा पुरूषांच्या बरोबरीने सामाजिक कार्यात सहभागी व्हायला पाहिजे अशी त्यांची भुमिका होती. त्याचा सहभाग हा उल्लेखनिय होता. इ. स. 1942 मध्ये नागपूर येथे पार पडलेल्या आखिल भारतीय दलित वर्ग परिषदेच्या तिसऱ्या अधिवेशनातील महिला परिषदेविषयी बाबासाहेब लिहितात. ''मला अत्यंत प्रभावित केले ते महिला परिषदेने, मी महिलांच्या पक्ष बाजूने आहे आणि सामाजिक कार्यात त्यांनी अधिकाधिक भाग घेणे मला आवडेल. अधिवेशनात हजाराच्या संख्येने महिलांनी उपस्थित राहणे हे दृश्य इतके विलोभनिय होते की, देवादिकांना देखील ते पाहण्याचा मोह व्हावा. त्याचा पेहराव त्यांचा नीटनेटकेपणा आणि ज्या संकल्पित आत्मविश्वासाने त्या परिषदेत वावरत होत्या. त्यामुळे तर माझ्या अंतःकरणाला विशेषच हर्ष झाला.'' डॉ. बाबासाहेब

आंबेडकराच्या हया विधानावरूनच विदर्भातील आंबेडकरी चळवळीमध्ये दलित स्त्रियांना किती सक्रीय होता याची आपल्याला कल्पना येते.

## —: संदर्भ :—


| | | |
|---|---|---|
| 1) | कोसारे एच. एल | — विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास नेहा प्रकाशन नागपूर प्र. आ. 2012 पृ. क 486 |
| 2) | कित्ता | — पृ. क. 487 |
| 3) | भगत एस. बी | — अमरावती जिल्हायातील सामाजिक, सांस्कृतिक चळवळीचे ऐतिहासिक सर्वेक्षण, अप्रकाशित शोधप्रबंध प्र. क. 225 |
| 4) | कोसारे एच. एल | — पुर्वोक्त प्र. कृ. 486 |
| 5) | कद्रेकर भा. र (संपा) | — जनता दि. 21 एप्रिल 1934 |
| 6) | मस्के बी. आर | — विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास नभ प्रकाशन अमरावती प्र.आ. 2012 प्र.क.304 |
| 7) | कोसारे एच. एल | — पुर्वेक्त पृ. क. 488 |
| 8) | केद्रेकर भा. र. (संपा) | — जनता दि. 20 नोव्हेंबर 1937 |
| 9) | कित्ता | — दि. 28 डिसेंबर 1987 |
| 10) | मस्के बी. आर | — पुर्वेक्त पृ. क. 305 |
| 11) | कित्ता | — पृ. क. 306 |
| 12) | लोखंडे हि. गो. भाऊ | — डॉ. आंबेडकरी सैनिकांची गौरवगाथा, सुधिर प्रकाशन वर्धा द्वि.आ. 2007 प्र.क. 187 |
| 13) | मस्के बी. आर | — पुर्वेक्त प्र.क. 308 |

# महिला महाविद्यालय
# नंदनवन नागपूर

**भौक्षणिक सत्र – 2021 – 2022**

**नाव :– जोत्सना बळवंत बोबडे**

**वर्ग :–** M.A Second year ($4^{th}$ Semester)

**विशय :– सं□ोधन**

**विशयां□ा :– कोरोना–19 चा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम**

## 1) कोरोना–19 चा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम ?

**उत्तर :–**

## प्रस्तावना :–

कोरोना व्हायरसचा उद्देश झाल्यानंतर गेल्या काही दिवसामध्ये शेअर बाजार कोसळल्याच्या बातम्या तुम्ही ऐकल्या असतील. कोरोनामुळे अर्थव्यवस्थेला खीळ, केल्यामुळे शेअर बाजारात घसरण गुंतवणुकदरामध्ये अविश्वासाचे वातावरण अशा हेडलाइन्स तुमच्या वाचण्यात किंवा ऐकण्यात आल्या असतील पण अर्थव्यवस्था ही फक्त शेअर लाचार, गुंतवणुकदार चा पुरतीच मर्यादित आहे का ? अर्थव्यवस्था ही फक्त याच गोष्टिबद्दल नसते. तर आपल्याकडे जो किराणा येतो, भाज्या येतात. त्यामुळे कोरोनाचा एकुण अर्थव्यवस्थेवर कायदा परिणाम झाला आणि भविष्यात होऊ शकतो हे आपण समजून घेऊया.

राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार त्याचा एका फेसबुक लाईव्ह मध्ये म्हणाले की कोरोना व्हायरस हे मोठ संकट आले. यामुळे अर्थव्यवस्थेला फटका बसला आहे. आणि पुढील 2.3 महीने आपली अर्थव्यवस्था नाजूक राहील आपण कटकसर करावी शरद पवार यांनी अर्थव्यवस्थेवर चिंता व्यक्त केली आहे. पण याच बरोबर तुम्ही दोनच दिवसापूर्वी दिल्लीतील आनंद विहार जस तमिनसवर जमलेल्या प्रवाशाची गर्दी तुम्ही पहिली असेल शुक्रवारी संध्याकाळी आनंद विहार टर्मिनलवर 30,000 लोक होते असा अंदाज आहे.

भारतात हजारो मजूर स्थलांतर करत आहोत पण जगात काय स्थिती आहे.

संयुक्त शत्रुशी संलग्न इंटरनॅशनल लेजर ऑर्गनायजेशनने (ILO) म्हटले आहे का कोरोना व्हायरसच्या साथीमुळे अंदाजे अडीच कोटी रोजगार जातील.

अर्थात च्याप्रमाणे 2008 – 09 मध्ये मंदी आल्यानंतर आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रयत्न करण्यात आले तसे झाले तर आपण म्हटले आहे. कोरोना व्हायरसमुळे लॉकडाऊेन कामाचे तास कमी होण तसेच पगारकपात या गोष्टीमुळे बेरोजगारी वाढू शकते. याचा सर्वात जास्त फटका विकसनशील देशाना बसेल अस ILO सांगत 2020 मध्ये अडीच कोटी कामगारांचा अंदाजे 860 अब्ज डॉलर 3.400 अब्ज डॉलर इतका पगार निघाला असता. पण पैसे त्याचा खिशात जाणार नाहीत. त्याचावर अवलंबुन असलेल्या दुकानदार वर्गालाही याच नुकसान सोसाव लागणार नाही आहे बर च्या कामगार वर्गातच्या लोकाजवळ काय किंवा रोजगार असेल त्यांची स्थिती खूप चांगली असणार आहे का तर त्याच उत्तर 120 ने दिल आहे. की 90 लाख ते साडेतीन कोटी इतके लोक वर्किंग पॉवर्टीमध्ये असतील म्हणजेच या लोकाकडे काम असेल पण रोजगार आपल्या गरजा राबवल्या इतकीही पगार त्यांना मिळणार नाही. कोरोनाच संकट येण्यापूर्वी जगभरात अशा गरीबीची संख्या 1 कोटी 40 लाख इतकी असावी.

## विकासवरात घसरण :–

भारताच्या समग्र अर्थव्यवस्थेवरही कोरोनाचे गंभीर परिणाम येथील भारताचा 2020 मध्ये विकासदर 5.3 टक्के राहील अस आकित मूडीच या संस्थेची केल पण आता त्यांनी सांगितल आहे. असताना विकासदर 2.5 टक्के इतका राहील. किती नोकऱ्या जातील आणि ही अर्थव्यवस्था पून्हा केव्हा रूळावर येईल. यांचा अंदाज आत्ताच लावण शक्य नसल्याचेही त्यांनी सांगितले. सर्व जग आर्थिक मुदयावर पून्हा उसळी मारेल असा विचार करण ही सर्वाचीच इच्छा आहे असेही ते म्हणाले.

## भारताने काय पावल उचलली आहेत ?

रिझर्व्ह बँकेने गव्हर्नर शक्तीकांत दास यांनी रेवो रेट आणि रिव्हर्स रेवी रेटमध्ये कपात करून उद्योग क्षेत्र आणि सर्वसामान्य दिलासा देण्यात प्रयत्न केला आहे. कोरोना विषाणुमूळे आर्थिक क्षेत्रावर मोठा परिणाम होणार असून GDP चे अपेक्षित उद्दिष्ट गोळा कठीण असल्यामुळे व्याजदरात कपात केल्याच त्यांनी सांगितल.

रेपो रेट 75 लेसिस पॉइटने कमी असून 4 टक्क्यावर आणला आहे. कर्ज स्वस्त झाल्यावर उद्योजक आणि गुंतवणूकदार जास्त प्रमाणात कर्ज उचलतात आणि त्यामुळे खर्चाला प्रोत्साहन मिळत त्यामार्गचा उद्देश त्यामुळे 3.7 लाख कोटी रूपये बाजारात उपलब्ध होतील, अस शक्तिकांत दासयांनी सांगितल. हे सर्व आपल्या गावी परत जात होते. पण हे लोक कोण आहेत ?

यातले पण बरेच जण हे मजूर कारखान्यामधले कामगार आहेत. लॉकडाऊनंतर बांधकाम बंद झाल. उद्योगधंदे दुकान बंद झाली. त्याचा परिणाम या लोकांचा रोजगार झाला. रोजगार नसल्यामुळे राहण्याचा जागेच आड, किराणा, भाज्या अशा गोष्टी विकत घेण्याची त्याची क्षमता नष्ट झाली आणि हे पुन्हा कधी सुरू होईल याची शाश्वती नसल्यामुळे अनेकांना आपल्या घराची वाट धरली. आपल्या देशाची परिस्थिती वेगळी आहे. इतर देशाप्रमाणे आपल्याला लॉकडाऊन करून आणणार नाही. तर ज्या गोष्टींना धोका आहे. त्याना वेगळ करावं लागेल या लॉकडाऊनमुळे हजारो स्थलांतरितांना आपले घरदार सोडून रस्त्यावर निघाव लागल.'' असही म्हणता येईल.

जागतिक कामगार संघटनेच भाकित आहे की, केवळ भारतातच नाही तर जगभरात अनेक लोकाच्या नोकऱ्या गेल्या आहेत. आणि भविष्यातही अनेकाचा नोकऱ्यावर टांगतो तलवार असणार आहेत. त्यांचा अंदाज आहे. कोरोनामुळे जगभरातल्या अंदाजे अडीच कोटी जणाच्या नोकऱ्या जाणार आहेत.

## कोरोनाच संकट भारतावर आणि जगावरही :–

पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांनी 29 मार्चला केलेल्या 'मन की बात' या कार्यक्रमात सर्व गरीबांची माफी मागितली. या लॉकडाऊनमध्ये सर्वात जास्त हाल याच वर्गाचे हाल झाले होते. केवळ भारतच नाही तर जगभरातले 190 हून अधिक देश कोरोनामुळे प्रभावित झाले आहेत.

## ए.पी.आय.च्या वाढणाऱ्या किंमती :–

एपीआयच्या वाढणाऱ्या किंमती चीनमधुन होण्याऱ्या आयच्या आयातीवर कोरोना व्हायरसमुळे परिणाम झालाय. चीनमधुन पुरवठा बंद झाल्याने औषध निर्मिती भारतातल्या कंपन्यांना आता महाग दरांनी एपीआय विकत घ्याव लागतय आरती कार्मा ही मुंबईतला कंपनी एपीआय आयात करते आणि औषध निर्मिती करणाऱ्या कंपन्यांना ते विकते. चीनमधुन येणाऱ्या कच्च्या मालाचा पुरवठा पूर्णपणे बंद असल्याच कंपनीचे मालक हेमल लाठीया यांनी सांगितले कोणतीही कन्साईन्मेट येत नाही आणि कधी येणार नाही हे माहिती नाही.

बीबीसी सोबत बोलताना त्यांना सांगितला. ''भारतात तयार होणार एपीआय ही चीवतवर अवलंबून आहे. म्हणूनच इथल्या एपीआय निर्मात्यावरही परिणाम झालेल्या आहे आणि तुम्ही चीनमधुन अवलबून आहे. म्हणूनच इथल्या एपीआय निर्मात्यावरही परिणाम झालेल्या आहे.

एप्रिलपर्यंत ही आयात कदाचित पून्हा पून्हा सुरू होईल असा अंदाज ते व्यक्त करतात. पण एक ते दीठ महिना मात्र ही अडचन कायम राहण्याची शक्यता आहे. हेमल लणिया सांगतात. ''एपीआयच्या जुन्या सोन्याच्या किंमती वाढवुन एपीआय विकतायत.

## सरकारी आकडेवारी काय सांगते ?

वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन च्या मागणाऱ्या आधारे डी पी टी आणि बी सी जी साठीची साधारण 65% औषध भारतात तयार होतात आणि गोवर साठीच्या लसीपैकी 90% भारतात तयार होतात.

जेनेरिक औषधाच उत्पादन करणाऱ्या जगातल्या प्रमुख कंपन्या 8 कंपन्या भारतीय आहेत. भारतातून निर्यात होणाऱ्या औषधापैकी 55% औषध उत्तर अमेरिका आणि युरोपातुन आयात केली जातात. हा सर्वात कोण देश आहे. 2018–19 साली कंपनीमध्ये भारताने जगातल्या 201 देशांना 95.2 कोटी डॉलर्सची औषध निर्यात केली होती. पण जर समजा आता चीनकडून एपीआयच्या पुरवण पुढच्या दीर्घ काळ बंद राहिला तर व्यक्ती मध्ये काटता सोबत जगभरात औषधाच्या तुटवडा केली होण्याची भीती व्यक्त होते.

## भारतातले एपीआय उत्पादन कमी का ?

चीनमधल एपीआय उत्पादन भारतापेक्षा 20 ते 30 टक्यांनी जास्त उसल्याच तज्ञाच मत आहे. पण चीनमधुन होणारी एपीआयची आयात थांबल्याने अडचन निर्माण होण्याची ही काही पहिली वेळ नाही. 2014 मध्येही याबाबत लोकसभेत प्रश्न विचारण्यात आला होता. यावेळी दोन्ही देशादरम्यान सीमेवर तणाव होता. त्यामुळेच कदाचित चीन कच्चा मालाचा पुरवठा थांबवू शकतो. अशी शक्यता वर्तवण्यात अंत होती या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी पंतप्रधान कार्यालयात बैठकीमध्ये देखील झाल्या आणि प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी एक टास्क फोर्स तयार करण्यात आली.

## उत्पादनात घट

बहुतेक कंपन्यानी एकतर उत्पादन कमी केलय वा त्यांच्याकडे असलेल्या पुरवठयामधुन त्या काम चालवत असून फक्त अतिशय गरजेच्या वस्तूच विकत घेण्यात येत असल्याच हेमल लाठिया सांगतात. अधिकचा स्टॉक कोणी विकत घेत नाहीये. मागणी जास्त आणि पुरवठा कमी असल्याने किंमती वाढतायेत. पण पुढच्या दीड महिन्यात हा पुरवठा सुरू झाला नाही. तर अडचणी आणि किंमती दोन्हीत वाढ होईल.

दोन–तीन महिने काम थांबू नये इतका स्टॉक सगळया कंपन्या बागवत असल्याच दिल्ली ड्रग्स ट्रेडर्स असोसिएशनचे जनरल सेक्रेटरी आशिष ग्रोव्हर सांगतात. पण त्यानंतर अडचण येऊ शकते. पण एक–दोन महिन्यात चीनमधून एपीआयची आयात सुरू होईल. अशी आशा ते व्यक्त करतात. आशिष ग्रोव्हर म्हणतात. ''उत्पादन सुरू आहे. पण एपीआयच्या किंमती वाढतायत एखादया औषधीसाठीच मागणी अचानक वाढू नये नाहीतर संकट आल्यासारख वाटेल चीनमध्ये कोरोना व्हायरस पसरला आहे. पण त्याच्याशी संबंधित कोणतेही औषध इधून जात नाही. म्हणूनच सध्या इतर औषधांच्या किंमतीवर परिणाम झालेला नाही. मागणी जास्त आणि पुरवठा कमी असल्याने किंमती वाढतायत. पण पुढच्या दीड महिन्यात हा पुरवठा सुरू झाला नाही, तर अडचणी आणि किंमती दोन्हीत वाढ होईल.

## जगाचा प्रास्तविक विकासदर :– 1.5

कोरोना व्हायरसच्या साथीमुळे जगाचा आर्थिक विकासदर मंदावणार असल्याच ऑर्गनायजेशन फॉर इकोनॉमिक डेव्हलपमेंटचे सेक्रेटरी जनरल हजर गुर्रिया यांनी म्हटलं आहे. या उद्रेकामुळे जगाचा किती नोकऱ्या जातील आणि ही अर्थव्यवस्था पुन्हा केव्हा रूळावर येईल, याचा अंदाज आत्ताच लावण शक्य

नसल्याचही त्यांनी सांगितल सर्व जग आर्थिक मुद्दयावर पुन्हा उसळी मारेल असा विचार करणं, ही सर्वाचीच इच्छा आहे असेही ते म्हणाले. लॉकडाउननंतर छोटे मोठे कारखाने बंद झाले. सप्लाय चेन तुटली आहे, थिइटर बंद झालीत दुकान, मॉल बंद झाली, IPL सारख्या स्पर्धा अनिश्चित काळासाठी पुढे गेल्या, इतकंच काय तर मंदिर बंद झालीत यामुळे मुंबईच महिन्याभराच नुकसान 16,000 कोटी इतकं होईल म्हणजेच एक दिवस मुंबई बंद असेल तर 500 कोटी रूपयाचं नुकसान होत. अशाप्रकारे भारतीय अर्थव्यवस्थेवर COVID-19 चा परिणाम झाला. भरपूर गरिब लोकांचे रोजगार बंद झाले मजूर वर्ग रस्त्यावर आले. COVID-19 मुळे उत्पादन घटले. याचा वाईट परिणाम आर्थिक दृष्या सरकारच्या तिजोरीवर पडला. भरपूर लोकांचे प्राण गेले.

## समारोप

कोविड 19 नंतर भारतीय अवस्थेमध्ये अनेक वाईट परिणाम निर्माण झाले आहेत. भारतीय अर्थव्यवस्था डगमगली होती. भारतीय तिजोरीला छळा लागला होता. भारतामध्ये अत्यंत वाईट परिस्थिती निर्माण झाली होती. भारतामध्ये अनेक प्रकारचे नियम बनण्यात आले आहे. भारतीय अवस्था ही अतिशय गुंतागुतीची आहे. त्यामुळे गरीबांकडुन होण्यारे हाल अपेष्ठा वेगळा कोविडमुळे अनेक लोकांना आपले घर सोडावे लागले. स्थलांतरणाचा प्रश्न उद्भवला होता अश्याप्रकारे सरकारने त्यांना सांभाळले व त्याच्यावर उपाययोजना केल्या. भारतामध्ये गरीब वर्ग जास्त प्रमाणात आहे. त्यामुळे बेकारी उद्भवली कोविड – 19 च्या काळात भारतीय लोकांना अनेक प्रकारच्या समस्याना सामना करावा लागला.

## ➢ संदर्भसुची


1) समाजवादी शिक्षणहक्क मासिक मार्च ते जून 2020

2) लोकमत 4 मार्च 2020

3) लोकमत 9 मार्च 2020

4) https://mr.m.wikipedia.org.wiki